पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

१४ वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३५ ■ रविवार, दि. १४ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# गुटख्याच्या या 'विषारी' बाजाराला 'आधार' कोणाचा ?

**• मकोकासाठी अकोला ठरत आहे फिट केस, कोण घेणार पुढाकार**
**• अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी, माफियांमध्ये व्हॉट्सअ‍ॅप कॉल सुरु**

प्रतिनिधी १४ जून

**अकोला:** गुटख्याच्या '२० रुपयाला तीन पुड्या...' अकोल्याच्या चौकाचौकांत, गल्लीबोळांत आणि पानटपऱ्यांवर आजकाल हे समीकरण अगदी सहज पाहायला मिळत आहे. विमल, वाह, नजर, काली बहार, निली बहार, हॉट, माणिकचंद आर एम डी, आणि बाहुबली यांसारख्या आरोग्याला घातक असणाऱ्या प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधी सुपारीची विक्री अकोला शहरात खुलेआम सुरू आहे. तरुण पिढीला कॅन्सरच्या खाईत लोटणाऱ्या या अनारोग्याच्या काळ्या बाजाराला नेमका कोणाचा वरदहस्त आहे, असा संतप्त सवाल आता अकोलेकर उपस्थित करत आहेत. एफ डी ए आयुक्त मुंढे यांनी गुटखा माफियांच्या विरोधात मकोका लावण्याचा आदेश काढला असताना अकोल्यातील एफ डी एचे अधिकारी पुढाकार घेण्यास पुढाकार टाळाटाळ करत आहे. नाही तर अकोल्यात अनेक फिट केसेस असून त्याकडे विभागाच्या अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष आहे.



### गुटखा माफियांची हुकूमशाही

◆अकोल्यातील गुटखा बाजारात सध्या काही ठराविक माफियांचीच हुकूमशाही चालत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. शहरात कालू, वहिद, नरेश, जैन आणि रामा नावाच्या गुटखा माफियांचे मोठे जाळे पसरले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जर या माफियांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही छोट्या विक्रेत्याने किंवा बाहेरच्या व्यक्तीने अकोल्यात माल आणण्याचा प्रयत्न केला, तर त्याच्यावर अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस विभागाकडून तात्काळ आणि कडक कारवाई केली जाते. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून शहरात राजरोसपणे कोट्यवधींची उलाढाल करणाऱ्या या मुख्य गुटखा माफियांना मात्र प्रशासनाकडून 'अभय' का दिले जात आहे? त्यांच्यावर कारवाईचा बडगा का उगारला जात नाही? हा मोठा संशोधनाचा विषय बनला आहे.

### एफ डी ए कुंभकर्णी झोपेत

◆शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याची मुख्य जबाबदारी ज्या अन्न व औषध प्रशासन विभागावर आहे. शहरात काही ठराविक ठिकाणे गुटखा वाहतूक आणि विक्रीचे मुख्य केंद्र बनली आहेत. एम.आय.डी.सी. परिसर आणि दगडी पुलावरील ट्रान्सपोर्ट कंपन्यांच्या माध्यमातून दररोज मोठ्या प्रमाणावर गुटख्याची बेकायदेशीर आवक-जावक होत आहे.
एम.आय.डी.सी. मधील डिके चौक हा गुटखा साठवणुकीचा मुख्य अड्डा बनला आहे. बीएसएनएल मुख्य कार्यालयाजवळील दुकानांमधून सर्वात जास्त प्रमाणात गुटख्याची किरकोळ आणि ठोक विक्री केली जात आहे. इतकेच नव्हे तर, शहरातील फळ विक्रेते देखील आता फळांच्या आडून गुटखा विकत असून, याकडेही अन्न व औषध विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे.

### अधिकारी आणि माफियांचे 'कॉल वर कॉल'

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अकोल्यातील अन्न व औषध प्रशासनाचे काही वरिष्ठ अधिकारी आणि हे गुटखा माफिया यांच्यात दररोज 'कॉल वर कॉल' सुरू असतात. एखादी कारवाई होणार असेल किंवा संशयास्पद हालचाली वाढल्या, की तत्परतेने निरोप पोहोचवले जातात. याच टीपमुळे गेल्या काही दिवसांत गुटखियांनी आपली मोठी गोदामे घाईघाईने रिकामी करून माल सुरक्षित स्थळी हलवला आहे. जर या संबंधित अधिकाऱ्यांचे आणि माफियांचे कॉल डिटेल्स तपासले, तर अकोल्यातील या काळ्या बाजाराचा आणि भ्रष्ट युतीचा मोठा भांडाफोड होऊ शकतो.


### 'त्या' बड्या औषध निर्मात्याची 'खास सेवा'

या संपूर्ण प्रकरणात आणखी एक धक्कादायक आणि खळबळजनक माहिती समोर आली आहे. अकोल्यातील एक बडा औषध निर्माता (फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरर) अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या 'विशेष सेवेत' कार्यरत आहे. या औषध निर्मात्याच्या महागड्या गाड्या थेट या शासकीय अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक सेवेसाठी रात्रंदिवस धावत आहेत. या बड्या औषध निर्मात्याच्या मालकीचा एक आलिशान फ्लॅट देखील अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी कशासाठी आणि कोणाच्या सांगण्यावरून वापरत होते, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणी आता वरिष्ठांनी दखल घेऊन, संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांची आणि गुटखा माफियांची कसून चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar
9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar
9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898

# राज्यात तीन महिने सिंचनासाठी पाणी बंद !

**♦ सरकारचे निर्देश : पिण्याच्या पाण्याला प्राधान्य**



प्रतिनिधी १४ जून

**मुंबई** : यंदा अल-निनो परिस्थितीचा परिणाम जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन, राज्य सरकारने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबत कठोर पावले उचलली आहेत. येत्या ३१ ऑगस्टपर्यंत राज्यातील शहरी व ग्रामीण भागांत अखंडित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा, यासाठी धरणांतील उपलब्ध जलसाठा पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यासोबतच तीन महिने सिंचनासाठीचे आवर्तन बंद ठेवण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा एल-निनोचा प्रभाव राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे पर्जन्यमानात घट होण्याचा अंदाज वर्तविला आहे. या पार्श्वभूमीवर भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून महसूल, जलसंपदा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचा आदेश सरकारने दिला आहे. सरकारच्या निर्देशानुसार, सर्व जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणे व जलाशयांतील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा; तसेच धरणांमधून सिंचनासाठी प्रस्तावित किंवा सुरू असलेली पाणी आवर्तने तत्काळ बंद करण्यात यावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# आता विठू माउलीच्या पायरीवर आंदोलन !

**♦ रोहित पवारांच्या आंदोलनाचा तिसरा दिवस, प्रकृती खालावली**

प्रतिनिधी १४ जून

**पंढरपूर** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रोहित पवार यांचे हे आंदोलन सुरू असून, दिवसेंदिवस या आंदोलनाची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. कर्जमाफीच्या जाचक अटी जोपर्यंत सरकार हटवत नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा आक्रमक पवित्रा रोहित पवार यांनी घेतला असून आता पंढरपुरात विठू माउलीच्या पायरीवर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

आजचा दिवस या आंदोलनासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. कारण आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी रोहित पवार यांची प्रकृती काहीशी खालावली असून त्यांची साखरेची



पातळी कमी झाली आहे. असे असूनही ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. आज दिवसभरात विविध राजकीय पक्षांचे दिग्गज नेते, आमदार आणि खासदार रोहित पवार यांच्या भेटीसाठी आंदोलनाच्या ठिकाणी पोहोचत आहेत. रोहित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सरकारला थेट इशारा दिलाय. 'सरकारकडून गेल्या तीन दिवसांपासून चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी जोपर्यंत ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत सरकारवर विश्वास ठेवता येणार नाही,' असे रोहित पवार म्हणाले. 'आता कुटुंबीयांची काळजीही वाढली आहे. गेल्या तीन दिवसांपासून मी मंडपातच अन्नत्याग आंदोलन करत आहे. आता माझी आई, पत्नी आणि मुलेही चिंतेत असून ते आज माझ्या भेटीसाठी येणार आहेत,' असे देखील रोहित पवार यांनी म्हटले. आज तिसऱ्या दिवशी राज्यभरातून खासदार संजय राऊत, मनोज जरांगे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे, राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांच्यासह अनेक प्रमुख नेते आंदोलनस्थळी पोहोचत असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.

# जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनेत दोन युवकांची हत्या

प्रतिनिधी १४ जून

**अकोला** : दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या प्राणघातक हल्ल्यात दोन युवकांचा मृत्यू झाला आहे. या दुहेरी हत्याकांडा सत्रामुळे संपूर्ण अकोला जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. शहर पोलीस दलाच्या रामदासपेठ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या तारफैल परिसरात काल रात्री १२ वाजेच्या सुमारास एका युवकाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. अंकुश नंदू गवळी (रा. अकोट फाईल, अकोला) असे मृत पावलेल्या युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंकुश गवळी हा रात्री तारफैल परिसरात असताना अचानक ३ ते ४ अनोळखी हल्लेखोरांनी त्याच्यावर धारदार चाकूने सपासप वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की, गंभीर जखमी झालेल्या अंकुशचा घटनास्थळावरच रक्ताच्या थारोळ्यात पडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलिसांनी तातडीने धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला. मृतकाच्या नातेवाईकाच्या प्रेमसंबंधाच्या वादाची कुरापत काढून आरोपींनी अंकुशला टार्गेट केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलीस या दिशेने कसून तपास करत आहेत.

दुसरी रक्ताळलेली घटना चांन्नी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली. आलेगाव येथे एका अज्ञात कारणावरून एका युवकावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या या युवकाला तातडीने उपचारासाठी अकोला येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी चांन्नी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून हल्ल्यामागील मुख्य कारणाचा शोध पोलीस घेत आहेत.

## आलेगावातील युवकाची कारला शिवारात हत्या

**♦ धारदार शस्त्राने खून; पातुर पोलिसात गुन्हा दाखल**

प्रतिनिधी १४ जून

**आलेगाव** : पातुर पोलिस स्टेशन हद्दीतील कारला शिवारात सुधाकरराव नाईक आश्रमशाळेच्या गेटसमोर एका १७ वर्षीय युवकाचा धारदार शस्त्राने खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. यश गजानन गिरे असे मृतक युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ही घटना आज सकाळी अंदाजे ५ ते ५:३० वाजण्याच्या सुमारास घडली.



यश गिरे हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने त्याला आलेगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र, त्याची गंभीर प्रकृती पाहता पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. परंतु, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

प्राथमिक अंदाजानुसार, तीन युवकांनी धारदार शस्त्राने वार करून हा खून केल्याचे बोलले जात आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार दराडे, घुगे व पातुर पोलिस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाला भेट दिली. मृतदेहाचे जीएमसी येथे शवविच्छेदन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेबाबत पातुर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, तपास पातुर पोलिस करत आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक रवाना झाले आहे. मात्र, हत्या कोणत्या कारणाने झाली हे स्पष्ट झाले नाही.

# भारतात चांगला मान्सून कोसळणार !

**♦ जपान आणि अमेरिकी संस्थेचा दिलासादायक अंदाज, पावसाची तूट भरून निघणार**

प्रतिनिधी १४ जून

**नवी दिल्ली** : प्रशांत महासागरात अतिशय तीव्र 'अल निनो' सक्रिय झाला असून, तो १९५० नंतरचा सर्वात भीषण ठरण्याची शक्यता अमेरिकेच्या हवामान संस्थेने वर्तवली आहे. याचा थेट व विपरीत परिणाम भारतातील आणि महाराष्ट्रातील मान्सूनवर होत असून, पावसाचे प्रमाण कमी होणे व दुष्काळाचे सावट वाढण्याची भीती हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या प्रवाहात अडथळे येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात चिंतेचे वातावरण आहे. याचदरम्यान, जपान आणि अमेरिकेच्या संस्थांनी एक दिलासादायक माहिती दिली आहे.

जपानी हवामानशास्त्र संस्था



आणि अमेरिकेच्या 'नॉर्थ अमेरिकन मल्टी मॉडेल एन्सेम्बल' नुसार जुलैमध्ये हिंद महासागरातील तटस्थ स्थिती जाऊन 'पॉझिटिव्ह आयओडी' विकसित होऊ शकतो. ऑगस्टपासून 'पॉझिटिव्ह आयओडी'ची तीव्रताही वाढू शकते. 'अल निनो'सोबत सकारात्मक 'आयओडी'ची स्थिती निर्माण झाल्यास मान्सून काळातील पावसाची तूट काही प्रमाणात भरून निघण्यास मदत होते. पूर्व आफ्रिकेजवळच्या पश्चिम हिंद महासागराचे तापमान जास्त राहिल्याने 'पॉझिटिव्ह आयओडीची' स्थिती निर्माण होते. त्यामुळे नैऋत्य मोसमी वाऱ्यांना जोर येऊन त्यांच्याबरोबर येणाऱ्या बाष्पामुळे भारतात चांगला पाऊस होतो.

### २० जूनपासून मुंबईसह महाराष्ट्राच्या उर्वरित भागात मान्सून दाखल

प्रशांत महासागरातील 'अल निनो'चा प्रभाव व अफगाणिस्तानकडून येणाऱ्या गरम व कोरड्या वाऱ्यांमुळे मान्सूनची वाटचाल रोखली गेली असून, मान्सून सध्या रत्नागिरीमध्येच रेंगाळला आहे. या कोरड्या वाऱ्याचा प्रभाव कमी झाला की मान्सूनच्या पुढील प्रवासाला सुरुवात होणार आहे. मुंबईसह महाराष्ट्राच्या उर्वरित भागात मान्सून दाखल होण्यासाठी आता थेट २० जून उजाडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# निर्भयपणे बोलले पाहिजे : खा. संजय राऊत

प्रतिनिधी १४ जून

**पुणे** : आज देशात हुकूमशाहीचे वातावरण असून, सामान्य जनतेला आणि कार्यकर्त्यांना संपवण्याचे कारस्थान सुरू आहे. सध्याचे सत्ताधारी सरकार निष्ठावंत कार्यकर्ता ही जमातच नष्ट करण्याचे आणि त्यांना संपवण्याचे काम करत आहे. अशा काळात केवळ चिमटे काढून चालणार नाही, तर थेट हल्ला करण्याची गरज आहे. या देशाला आज चिमट्यांची नव्हे, तर थेट आणि रोखठोक बोलण्याची गरज आहे, असे परखड मत मांडत देशाची लोकशाही टिकवण्यासाठी निर्भय होणे गरजेचे असून, सरकारच्या विरोधात बोलले पाहिजे, असे उद्धवसेनेचे नेते व खासदार संजय राऊत यांनी सांगितले.

# अरे बापरे....एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह आढळले !

**मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे खळबळजनक घटना, हत्या की घातपात, पोलीस तपास सुरू**

प्रतिनिधी १४ जून

**वाशिम** : मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.या चौघांची हत्या झाली की, आत्महत्या हे शवविच्छेदनाच्या अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. मात्र या घटनेमुळे तिवळी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संतोष बकाल त्यांची पत्नी व दोन चिमुकल्या मुलांचा मृत्यू झाला आहे. मुलांना विहिरीत टाकून संतोष यांनी टॉवरला गळफास घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली असली, तरी हा आत्महत्येचा प्रकार की घातपात याचा तपास शिरपूर पोलीस करत आहेत. मृत महिलेच्या भावाने घातपाताचा आरोप केला असून, घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मृत इंद्रायणी बकाल यांचे भाऊ सुधाकर इंगोले यांनी या घटनेत घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. संतोष बकाल यांना सख्ख्या भावाकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळत होत्या व



त्याचे रेकॉर्डिंगही उपलब्ध असल्याचा दावा त्यांनी केला. याप्रकरणी पूर्वी अनेकदा पोलिसांत तक्रारी दिल्याचे सांगत निष्पक्ष चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. चारही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले असून आत्महत्या की घातपात याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शवविच्छेदन अहवाल आणि तपासानंतरच सत्य स्पष्ट होईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक केशव वाघ यांनी दिली. या घटनेमुळे तिवळी गावासह संपूर्ण मालेगाव तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे

## मनपा समोरील रस्त्यावर सैल गिट्टीचा सापळा, वाहनचालकांच्या जीवाशी खेळ

**अकोला :** महानगरपालिका कार्यालयासमोर रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले. मात्र कामानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात सैल गिट्टी टाकून ठेवण्यात आल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या गिट्टीचा मोठा फटका बसत असून वाहन घसरण्याच्या घटनांमुळे अपघाताची भीती वाढली आहे. प्रशासन आणि संबंधित ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

हा शहरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग म्हणून ओळखला जातो. या मार्गावर नुकतेच रस्त्याचे काम करण्यात आले. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर पडलेली सैल गिट्टी हटविण्याची तसदी घेण्यात आलेली नसल्याचे दिसून येत आहे.

रस्त्यावर विखुरलेली गिट्टी वाहनांच्या चाकाखाली येत असल्याने दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडत आहे. अनेक वाहनचालकांना अचानक ब्रेक लावताना किंवा वळण घेताना घसरण्याचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# समाजाची यशाची व्याख्या आणि तणावग्रस्त तरुणाई

'महागडा फोन, मोठा पगार, आलिशान घर, चारचाकी गाडी आणि प्रतिष्ठित नोकरी' हीच आजच्या समाजाने यशाची व्याख्या ठरवून दिली आहे. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर या यशाचे चित्र कोरले जाते. परिणामी स्वतःची आवड, क्षमता आणि स्वप्ने यांना दुय्यम स्थान मिळते. स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना आणि आर्थिक सुरक्षिततेची चिंता यामुळे आजची तरुणाई प्रचंड तणावाखाली जगत आहे. यशाच्या मागे धावताना अनेक तरुण स्वतःलाच हरवून बसत आहेत.



आजचे युग स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते.शिक्षण,नोकरी करियर आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे.अनेक विद्यार्थ्यांचे जीवन कोचिंग क्लास, टेस्ट सिरीज आणि अभ्यास यांच्याभोवती फिरत आहे. JEE, NEET, UPSC यांसारख्या परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली जाते. या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी लाखो युवक-युवती दिवस-रात्र मेहनत घेत असतात. मात्र प्रत्येकाला यश मिळतेच असे नाही. काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव, सामाजिक दबाव किंवा इतर अनेक कारणांमुळे आपल्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो.अशा परिस्थितीत समाजाने ठरवून दिलेल्या यशाच्या व्याख्येमुळे तरुणाईवर मानसिक तणावाचे मोठे ओझे निर्माण होत आहे.या प्रक्रियेत त्यांचे छंद, खेळ, कला आणि आनंदाचे क्षण हरवून जातात.पालकांच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपडत असतात. प्रत्येक परीक्षेत यश मिळविण्याची सक्ती, गुणांची तुलना आणि अपयशाची भीती यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेला सामोरे जातात. आज एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या उत्पन्नावर किंवा पदावर ठरवले जाते. मात्र पैसा मिळाला म्हणजे आनंद मिळेलच असे नाही. आर्थिक यश असूनही अनेक जण मानसिक समाधान, कौटुंबिक आनंद आणि अंतर्मनाची शांतता गमावून बसतात.

ज्या व्यक्तीला चित्रकला, साहित्य, संगीत, क्रीडा किंवा समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांत करिअर करण्याची इच्छा असते अशा अनेक तरुणांना 'यात भविष्य नाही' असे सांगितले जाते. परिणामी ते स्वतःच्या आवडीचा त्याग करून दुसऱ्यांच्या स्वप्नांचे ओझे वाहू लागतात.

समाज यशस्वी व्यक्तींचा गौरव करतो, पण अपयशी व्यक्तींच्या संघर्षाकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे अपयश आले की अनेक तरुण स्वतःला कमी लेखू लागतात. प्रत्यक्षात अपयश ही शिकण्याची आणि अधिक सक्षम होण्याची संधी असते.

यशाची खरी व्याख्या प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी असते. केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा यालाच यश मानणे योग्य नाही. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आनंद, समाधान आणि आत्मिक शांतता मिळते, तेच त्यांच्यासाठी खरे यश असते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने तरुणांच्या आवडीनिवडी समजून घेऊन त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. प्रत्येकाला स्वतःचे स्वप्न जगण्याचा अधिकार आहे. कारण आयुष्य केवळ यशस्वी होण्यासाठी नसते, तर समाधानी आणि आनंदी होण्यासाठीही असते.

समाजाने यशाची व्याख्या बदलण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक व्यक्तीचे यश हे त्याच्या समाधानात, आनंदात आणि स्वप्नपूर्तीत दडलेले असते. पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची असली तरी मानसिक शांतता, आत्मसंतोष आणि जीवनातील आनंद याहून मोठे यश दुसरे नाही. तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार वाटचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तरच खऱ्या अर्थाने सक्षम,आनंदी आणि सुदृढ समाजाची निर्मिती होईल.

**उर्वशी मनीष संघवी**
मुर्तिजापूर, जि.अकोला

# शेअर मार्केटच्या वाढत्या क्रेझमुळे समाजासमोर नवे आव्हान

'पैसा कमावणे आवश्यक आहे, पण पैशासाठी जगणे धोकादायक ठरू शकते,' हे वाक्य आजच्या काळात अधिक समर्पक वाटू लागले आहे. गेल्या काही वर्षांत शेअर मार्केट, इंट्राडे ट्रेडिंग, ऑप्शन ट्रेडिंग आणि विविध गुंतवणूक प्लॅटफॉर्मची लोकप्रियता झपाट्याने वाढली आहे. मोबाईलवर एका क्लिकमध्ये ट्रेडिंग करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने तरुणांपासून ते निवृत्त व्यक्तींपर्यंत अनेक जण या क्षेत्राकडे आकर्षित होत आहेत.मात्र, या आकर्षणाचे रूपांतर अनेक ठिकाणी व्यसनात होत असल्याचे दिसून येत आहे. काही लोक दिवसातील अनेक तास बाजारातील चढ-उतार पाहण्यात घालवत आहेत. घरातील सदस्यांशी संवाद कमी होत आहे, सामाजिक आयुष्य मर्यादित होत आहे आणि अनेकांचे मानसिक संतुलनही बिघडत आहे.नफा दिसतो, पण नुकसान लपून राहते सोशल मीडियावर अनेकदा ट्रेडिंगमधून लाखो रुपये कमावल्याच्या कथा समोर येतात. पण त्याचवेळी नुकसान झालेल्या हजारो लोकांच्या वेदना फारशा चर्चेत येत नाहीत. बाजारातील तोटा सहन न झाल्याने काही जण कर्जबाजारी होतात, तर काही जण नैराश्याच्या गर्तेत जातात. काही दुर्दैवी घटनांमध्ये आर्थिक तणावामुळे आत्महत्यांसारखे टोकाचे निर्णय घेतल्याचेही समोर आले आहे.कुटुंबापेक्षा बाजार महत्त्वाचा?अनेक कुटुंबांमध्ये एक नवीन समस्या निर्माण होत आहे. घरातील सदस्य एकत्र असले तरी त्यांचे लक्ष सतत मोबाईलवरील ट्रेडिंग ॲप्सवर असते. मुलांशी संवाद, आई-वडिलांची काळजी, जोडीदारासोबतचा वेळ आणि



कौटुंबिक जबाबदाऱ्या याकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.


मानसशास्त्रज्ञांच्या मते, सतत नफा-तोट्याचा विचार केल्याने व्यक्ती तणावग्रस्त बनते. याचा परिणाम त्याच्या वागणुकीवर, निर्णयक्षमतेवर आणि नातेसंबंधांवर होतो.

गुंतवणूक करा, पण विवेकानेशेअर मार्केट हे चुकीचे नाही. उलट दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध गुंतवणूक ही आर्थिक प्रगतीचा उत्तम मार्ग ठरू शकते. मात्र, झटपट श्रीमंत होण्याची मानसिकता, अतिरेकी जोखीम आणि अवास्तव अपेक्षा यामुळेच समस्या निर्माण होते.आर्थिक तज्ज्ञांचे मत आहे की, आपल्या उत्पन्नाचा एक मर्यादित भागच गुंतवणुकीसाठी वापरावा. कर्ज घेऊन किंवा जीवनावश्यक खर्चाचा पैसा बाजारात गुंतवणे धोकादायक ठरू शकते.

पैसा पुन्हा मिळू शकतो, माणसे नाहीजीवनात पैसा महत्त्वाचा आहे, परंतु तोच सर्वस्व नाही. एकदा तुटलेले नाते, हरवलेला विश्वास किंवा गमावलेली माणसे पुन्हा सहज मिळत नाहीत. आर्थिक यशासोबत मानसिक स्वास्थ्य, कौटुंबिक आनंद आणि सामाजिक जबाबदारी यांचाही समतोल राखणे आवश्यक आहे.

आजच्या तरुण पिढीने आणि गुंतवणूकदारांनी हे लक्षात ठेवण्याची गरज आहे की, शेअर मार्केट हे जीवनाचा एक भाग आहे; संपूर्ण जीवन नाही. बाजारातील आकडे बदलत राहतील, पण आपल्या आयुष्यातील माणसे कायमची असतात.

शेअर मार्केटमधील वाढती क्रेझ ही आर्थिक जागरूकतेचे लक्षण असले तरी तिचे व्यसन समाजासाठी धोकादायक ठरू शकते. पैशाच्या मागे धावताना स्वतःचे मानसिक आरोग्य, कुटुंब आणि नातेसंबंध गमावू नयेत. कारण शेवटी बँक खात्यातील आकड्यांपेक्षा आपल्या माणसांची साथच खऱ्या अर्थाने जीवन समृद्ध करते.



**नेहा पाटील**
अँकर , रिपोर्टर
आरआरसी न्यूज, अकोला

## मत-मतांतराची दुनिया

असंख्य चेहरे, असंख्य वाटा,
निरनिराळ्या माणसांचा हा मेळा,
कुणी शांत, कुणी बोलका,
प्रत्येकाचा स्वभाव आहे वेगळा.

शब्दांच्या पुलावरून चालताना,
विचारांची होते देवाण घेवाण,
नव्या कल्पनांना धुमारे फुटतात,
संवादातून कळते जगाची जाण.

कधी जुळतात मते अगदी सहज,
कधी पडते मतांतरांची दरी,
वाद होतात, चर्चाही रंगतात,
तरी संवादाची ओढ उरतेच खरी.
सगळ्यांचाच विचार एक असता,
तर हे जग किती फिके वाटले असते.
मतांतरांच्या या घुसळणीतूनच,
विचारांचे नवे लोणी गवसते.

भिन्न दृष्टिकोन जेव्हा एकत्र येतात,
तेव्हाच प्रगतीची नवी दिशा मिळते,
अनेक रंगांच्या या रंगमंचावर,
माणुसकीची सुंदर रांगोळी फुलते.

म्हणूनच असू दे मतभेद कितीही,
मनामध्ये नसावे कधी कटुतेचे वाण
निरनिराळ्या माणसांच्या दुनियेत,
असावी आपल्या विचारांची जाण

**उर्वशी मनीष संघवी**
मुर्तिजापूर, जि.अकोला

# बाल्कनीमध्ये वाढलेले वड, पिंपळाचे झाड कसे काढावे !

वड आणि पिंपळाच्या बिया प्रामुख्याने पक्ष्यांमुळे घराजवळ येतात. या बिया भिंतींच्या छोट्या फटीत, कुंड्यांच्या बाजूला किंवा गच्चीवरील ओलसर जागेत अडकतात. पाणी आणि ओलावा मिळताच त्यांना कोंब फुटतो आणि काही दिवसांतच मुळे आतपर्यंत पोहोचू लागतात. त्यामुळे गच्चीवर पाणी साचणे, भिंतींना ओल येणे किंवा प्लास्टर निखळणे अशा समस्या दिसू लागतात.अनेक जण ही रोपे हाताने उपटून टाकण्याचा प्रयत्न करतात. पण फक्त वरचा भाग काढून टाकल्याने उपयोग होत नाही. कारण मुळे जमिनीत किंवा भिंतीच्या आत जिवंत राहतात आणि काही दिवसांनी पुन्हा नवीन पालवी फुटू लागते. त्यामुळे रोप पूर्णपणे नष्ट करण्यासाठी मुळांवर उपाय करणे आवश्यक असते.

यासाठी मिठाचा वापर प्रभावी घरगुती उपाय मानला जातो. खडे मीठ झाडाच्या मुळाजवळ टाकल्याने



त्याची वाढ कमी होण्यास मदत मिळते. तसेच कोमट पाण्यात मीठ मिसळून ते फटीत टाकल्यास मुळे कमकुवत होऊ लागतात. हा उपाय काही दिवस सातत्याने केल्यास रोप हळूहळू वाळण्यास सुरुवात होते. मात्र हे करताना आजूबाजूच्या इतर झाडांवर मिठाचे पाणी पडणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे असते.जर रोप मोठे झाले असेल तर आधी त्याच्या फांद्या छाटून घ्याव्यात. त्यानंतर मुळांच्या भागात मीठ टाकल्यास चांगला परिणाम दिसून येतो. काही ठिकाणी व्हिनेगर आणि मिठाचे मिश्रण वापरण्याचाही सल्ला दिला जातो. हे मिश्रण झाडाच्या भागावर फवारल्यास त्याची वाढ मंदावू शकते. झाड काढल्यानंतर भिंतीतील फटी त्वरित बंद करणे आवश्यक असते. सिमेंट किंवा पाण्यापासून संरक्षण करणारा थर दिल्यास पुन्हा बिया अडकण्याची शक्यता कमी होते. तसेच गच्ची आणि बाल्कनीची नियमित स्वच्छता केल्यास अशा रोपांची वाढ टाळता येते.

**वड-पिंपळाची झाडं भिंतीत कशी उगवतात?**
पक्ष्यांमुळे किंवा वाऱ्यामुळे वड-पिंपळाच्या बिया भिंतींच्या फटीत, कुंड्यांच्या बाजूला किंवा टेरेसवरील ओलसर भागात अडकतात. पावसाचे पाणी आणि ओलावा मिळाल्यावर त्या बिया रुजतात आणि हळूहळू मुळे वाढू लागतात. काही दिवसांनी ही झाडं इतकी मजबूत होतात की भिंतींमध्ये क्रॅक पडण्यास सुरुवात होते.

**झाड काढताना या चुका टाळा**
अनेक जण झाड जोराने खेचून काढतात. त्यामुळे भिंतीचा लेप निघू शकतो किंवा मोठ्या भेगा पडू शकतात. फक्त पाने किंवा खोड कापल्यास मुळे जिवंत राहतात आणि काही दिवसांनी झाड पुन्हा उगवते. काही जण तीव्र रसायने वापरतात. त्यामुळे भिंतींचे नुकसान होऊ शकते आणि घरातील इतर झाडांवरही परिणाम होऊ शकतो.

**रोपे उगवू नयेत यासाठी काय कराल?**
बाल्कनी आणि गच्ची नियमित स्वच्छ ठेवा, भिंतींमध्ये भेगा दिसताच दुरुस्ती करा, पावसाळ्यापूर्वी पाण्याचा अडथळा करणारा थर द्या, कुंड्यांच्या मागे किंवा पाण्याचा निचरा होणाऱ्या भागात ओलावा साचू देऊ नका, आठवड्यातून एकदा गच्ची आणि भिंती तपासा.

**श्रद्धा आणि योग्य काळजी**
वड आणि पिंपळ ही झाडे अनेकांसाठी श्रद्धेची मानली जातात. त्यामुळे काही लोक ही झाडे काढताना संकोच करतात. अशावेळी छोटी रोपे कुंडीत लावून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी हलवण्याचा पर्याय निवडू शकता. मात्र घराच्या भिंतीत वाढणारी झाडे दुर्लक्षित करणे योग्य नाही, कारण त्यामुळे घराच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो.

**मिठाचे पाणी तयार करा**
एका बाटलीत कोमट पाणी घ्या आणि त्यात भरपूर मीठ मिसळा. हे पाणी झाडाच्या मुळांवर आणि फटीत सावकाश ओता. सलग काही दिवस हा उपाय केल्यास झाड कोमेजू लागते. झाड काढल्यानंतर ती जागा मोकळी ठेवू नका. त्या फटीत सिमेंट किंवा पाण्याला अडथळा करणारा लेप भरा. त्यामुळे पुन्हा बिया अडकून रोप उगवण्याची शक्यता कमी होते. जर झाड हट्टीपणे पुन्हा उगवत असेल तर मिठासोबत व्हिनेगर वापरू शकता. एका बाटलीत व्हिनेगर आणि मीठ मिसळून झाडावर फवारा. या मिश्रणामुळे झाडाची वाढ मंदावते. मात्र हा फवारा इतर चांगल्या झाडांवर पडणार नाही याची काळजी घ्या.

## दिन विशेष

# प्रत्येक रक्तदान हे केवळ एक वैद्यकीय कृती नाही!

जागतिक रक्तदाता दिन दरवर्षी १४ जून रोजी साजरा केला जातो. सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादनांच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि रक्तदात्यांचे त्यांच्या ऐच्छिक, जीवन वाचवणाऱ्या रक्तदानाबद्दल आभार मानण्यासाठी , हा कार्यक्रम २००४ मध्ये पहिल्यांदा चार प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांनी आयोजित केला होता. जागतिक आरोग्य संघटना, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रेड क्रॉस अँड रेड क्रेसेंट सोसायटीज इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ब्लड डोनर ऑर्गनायझेशन्स आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्युजन.

जागतिक रक्तदाता दिन हा जागतिक आरोग्य संघटनेने साजरा केलेल्या ११ अधिकृत जागतिक सार्वजनिक आरोग्य मोहिमांपैकी एक आहे, ज्यात जागतिक आरोग्य दिन, जागतिक चागास रोग दिन, जागतिक क्षयरोग दिन, जागतिक लसीकरण सप्ताह, जागतिक रुग्ण सुरक्षा दिन, जागतिक मलेरिया दिन, जागतिक तंबाखू विरोधी दिन, जागतिक हिपॅटायटीस दिन, जागतिक प्रतिजैविक जागरूकता सप्ताह आणि जागतिक एड्स दिन यांचा समावेश आहे.

रक्त आणि रक्त उत्पादनांचे आदानप्रदान दरवर्षी लाखो लोकांचे प्राण वाचवण्यास मदत करते. हे जीवघेण्या आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना जास्त काळ आणि चांगल्या दर्जाचे जीवन जगण्यास मदत करू शकते, तसेच गुंतागुंतीच्या वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया प्रक्रियांना आधार देते. माता आणि प्रसूतीपूर्व काळजीमध्ये देखील याची एक आवश्यक,



आज जागतिक रक्तदाता दिन

जीवनरक्षक भूमिका आहे . सुरक्षित आणि पुरेसे रक्त आणि रक्त उत्पादने उपलब्ध झाल्यास प्रसूतीदरम्यान आणि प्रसूतीनंतर होणाऱ्या तीव्र रक्तस्रावामुळे होणारे मृत्यू आणि अपंगत्वाचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकते.


बऱ्याच देशांमध्ये, सुरक्षित रक्ताचा पुरेसा पुरवठा नाही आणि रक्त सेवांसमोर पुरेसे रक्त उपलब्ध करून देण्याचे, तसेच त्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आव्हान आहे. स्वयंसेवी विनामोबदला रक्तदात्यांच्या नियमित दानातूनच पुरेसा पुरवठा सुनिश्चित केला जाऊ शकतो. २०२० पर्यंत सर्व देशांनी आपला संपूर्ण रक्तपुरवठा स्वयंसेवी विनामोबदला रक्तदात्यांकडून मिळवावा, हे जागतिक आरोग्य संघटनेचे ध्येय आहे. २०१४ मध्ये, ६० देशांचा राष्ट्रीय रक्तपुरवठा ९९-१०० टक्के स्वयंसेवी विनामोबदला रक्तदानावर आधारित होता, तर ७३ देश अजूनही मोठ्या प्रमाणावर कुटुंब आणि पैसे घेऊन रक्तदान करणाऱ्या दात्यांवर अवलंबून होते.

जागतिक रक्तदाता दिन दरवर्षी १४ जून रोजी जगभरातील लोकांद्वारे साजरा केला जातो.

# अकोल्याच्या 'दऊत लेखणी' ने पटकावला 'छंदश्री ' आंतरराष्ट्रीय दिवाळी पुरस्कार

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** ' छंदश्री ' आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेमध्ये अकोल्याच्या ' दऊत लेखणी ' मासिकाने ' छंदश्री तृतीय पुरस्कार ' पटकाविला आहे. पुणे येथील छंद श्री प्रतिष्ठानातर्फे सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या अंकाचे मुख्य संपादक विजय देशमुख यांनी पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या एका शानदार समारंभात हा पुरस्कार स्वीकारला. सन २०२५ च्या




दिवाळीनिमित्ताने घेतलेल्या या स्पर्धेचा निकाल आत्ता एका आठवड्यापूर्वी घोषित करण्यात आला आहे. प्रख्यात गायक व संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांची मुलगी तथा भारताच्या गान कोकिळा लता मंगेशकर यांच्या भाची राधाताई मंगेशकर यांचे हस्ते विजय देशमुख यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या अंकाचे अतिथी संपादक म्हणून नांदेड येथील डॉ. पृथ्वीराज तौर व अकोला येथील डॉ. स्वाती दामोदरे यांनी अतिथी संपादक म्हणून काम बघितले होते. याच अंकातील रशियन कथेच्या ' सोन्याचा दात वाली बाई ' या अनुवादित कथेसाठी डॉ. अमित पंडित यांना अनुवादित साहित्य विभागांमध्ये द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

# हिवरखेड बगीचा प्लॉट मध्ये पोलिसांची धाड

## गोमांस जप्त करून एका गोऱ्ह्याला जीवनदान

प्रतिनिधी १४ जून

**हिवरखेड :** स्थानिक बगीचा प्लॉट मध्ये १३ जूनला पोलिसांनी धाड टाकली असता, येथे अवैध गोमास विक्री सुरू असल्याचे पोलिसांना आढळून आले. ३२० किलोचे गोवंश २ लोखंडी सुरे, १ तराजू १ टोचा, वजन माप , व एक जिवंत गौरा असा एकूण १ लाख ५०, रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



आरोपी शेख रहीम शेख गफूर, शेख शकील शेख इस्माईल यांच्या विरुद्ध कलम ३२५ (५ क)९ ९ अ महाराष्ट्र प्राणी सुरक्षा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला, सदरची कारवाई ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज मडावी, प्रतीक कुंजाम, विनोद खर्डे, रोहन बोराकेल यांनी केली.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
रविवार दि. १४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# स्मार्ट मीटरच्या नावाखाली नागरिकांवर एकतर्फी निर्णय लादू नका अन्यथा रस्त्यावर उतरू : निलेश देव

प्रतिनिधी १४ जून



**अकोला :** शहरातील वीज ग्राहकांना मोठ्या प्रमाणात विद्यमान मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याबाबत संदेश पाठविण्यात येत आहेत. मात्र केवळ संदेश पाठवून नागरिकांना विश्वासात न घेता, पुरेशी माहिती न देता व प्रक्रिया स्पष्ट न करता मीटर बदलण्याची घाई सुरू असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

वंचित बहुजन आघाडीचे गटनेता व नगरसेवक निलेश देव यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, स्मार्ट तंत्रज्ञानाला विरोध नाही; पण नागरिकांच्या हक्कांवर अतिक्रमण करून, पारदर्शकता न ठेवता आणि उत्तरदायित्व टाळून कोणताही निर्णय अकोलेकरांवर लादला जाणार नाही.

आज सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अनेक प्रश्न आहेत – मीटर बदलण्याचा आधार काय?

उद्याचे बिल कसे येणार? हे महावितरणने स्पष्ट करावे. तसेच प्रत्येक ग्राहकाला मीटर बदलण्याचे कारण लेखी स्वरूपात द्यावे. मीटर बसविण्यापूर्वी अधिकृत कर्मचारी व कंत्राटदारांची माहिती जाहीर करावी, जुने व नवीन मीटर रीडिंगची लेखी नोंद ग्राहकाला द्यावी, स्मार्ट मीटरमुळे बिलिंगमध्ये काय बदल होणार याबाबत जनजागृती करावी, नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करावा, कोणत्याही ग्राहकाकडून थेट किंवा अप्रत्यक्ष आर्थिक आकारणी होणार नाही याची हमी द्यावी.

महावितरण प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात येत आहे की, नागरिकांना विश्वासात न घेता, दबाव टाकून किंवा अपुरी माहिती देऊन मीटर बदलण्याचे काम सुरू राहिल्यास वंचित बहुजन आघाडी जनतेसोबत लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन उभारेल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक निलेश देव यांनी दिला आहे.

# घरकुल लाभापासून वंचित ठेवल्याने ग्रामपंचायत सचिवाविरुद्ध बेमुदत आमरण उपोषण

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** शासकीय घरकुल योजनेच्या लाभापासून आपल्या कुटुंबाला जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याचा आणि दुजाभाव केल्याचा गंभीर आरोप करत, बार्शिटाकळी तालुक्यातील राहित येथील एका मजुराने प्रशासनाविरुद्ध थेट उपोषणाचे हत्यार उपसले आहे. ग्रामपंचायत सचिवावर तात्काळ निलंबनाची कारवाई व्हावी, या मागणीसाठी येत्या मंगळवारी, दिनांक १६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंडप न टाकता उघड्यावर



बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा या नागरिकाने दिला आहे.

या संदर्भात राहित (साहित) ता. बार्शिटाकळी येथील रहिवासी श्री. शिवदास उत्तमदास वाहूरवाघ (वय ५३ वर्ष, व्यवसाय - मजुरी) यांनी गुरुवारी, ११ जून २०२६ रोजी अकोला जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले आहे. शिवदास वाहूरवाघ यांनी निवेदनात नमूद केल्यानुसार, राहित ग्रामपंचायतीचे संबंधित सचिव खिल्लारे यांनी त्यांच्या पत्नी सौ. रंजना शिवदास वाहूरवाघ यांच्या हक्काच्या घरकुल लाभासाठी पात्रतेचे कडक निकष लावले आणि कोणतीही ठोस कारण नसताना त्यांना आजवर या लाभापासून वंचित ठेवले.

दुसरीकडे, त्याच ग्रामपंचायती अंतर्गत सामाईक रेशन पत्रिकेत (डी.वन रजिस्टर) समाविष्ट असलेल्या इतर व्यक्तींना मात्र सर्व अटी व शर्ती बाजूला ठेवून घरकुलाचा लाभ देण्यात आला. एकाच रेशन कार्डवरील इतर ४ कुटुंबांतील व्यक्तींना पात्र ठरवून केवळ आपल्याच कुटुंबाला जाणूनबुजून डावलण्यात आल्याचा आरोप वाहूरवाघ यांनी केला आहे.

आपल्या मागणीवर ठाम राहत शिवदास वाहूरवाघ यांनी स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत संबंधित दोषी ग्रामपंचायत सचिवावर निलंबनाची कारवाई करून तसे अधिकृत 'आश्वासन पत्र' मिळत नाही, तोपर्यंत ते आपले बेमुदत आमरण उपोषण मागे घेणार नाहीत. १६ जून रोजी होणाऱ्या या उपोषणामुळे आता बार्शिटाकळी पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासनात कोणती खळबळ उडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# हातरुण ग्रामपंचायतीमध्ये आरक्षण सोडत जाहीर

प्रतिनिधी १४ जून

**हातरुण :** ग्रामपंचायतीच्या आरक्षणाची घोषणा करण्यात आली. या नव्या आरक्षण सोडतीमुळे अनेक प्रभागांत महिलांना मोठी संधी मिळाल्याने निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या दिग्गज पुरुष उमेदवारांचे राजकीय गणित बिघडले असून त्यांना मोठा धक्का बसला आहे.



दिग्गज उमेदवारांचे चेहऱ्यावर बारा वाजल्याचे दिसून आले आहेत. हातरूण ग्रामपंचायतीच्या एकूण ५ प्रभागांमधील आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. प्रभाग क्र. १ ओबीसी महिला, पुरुष, महिला पुरुष ओपन, प्रभाग क्र. २ ओबीसी महिला, ओपन महिला, ओपन महिला पुरुष. प्रभाग क्र. ३ ओबीसी महिला, खुला, ओपन .महिला, ओपन महिला पुरुष, प्रभाग क्र ४ मध्ये जनरल ओपन महिला, ओपन महिला पुरुष.

प्रभाग क्र. ५ एससी महिला, ओपन महिला.

या प्रकारे सोडत काढण्यात आली. सदर प्रक्रियेसाठी अध्यासी अधिकारी विनोद काळे, ग्राम पंचायत अधिकारी शशांक धुळे,तलाठी अजय भटकर, अनिल बॉसकार, अध्यक्ष सरपंच हुजेफा परवीन सैयद काजीम, शारूख पठाण, सोहेल अहेमद वसीम आहेमद, ग्राम पंचायत सदस्य युसुफ खान वाजीद खान आणि सर्व सदस्य आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत शांततेत संपन्न झाला.

## दारुबंदी विभागाने अवैध दारु पकडली

**अकोट :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने तालुक्यातील बोर्डी, पोपटखेड, अंबाडी, चोहोट्टा बाजार या ठिकाणी अवैध दारुसह मोटारसायकल असा १ लाख ९८ हजार ७०० मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी आरोपींना ताब्यात घेण्यात आले. पोलिस कारवाई सुरु आहे. अवैध धंद्यांना आवर घालण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

## गुडधी ते मोठी उमरी एकेरी वाहतूक धोकादायक

**अकोला :** गुडधी ते मोठी उमरीतील पेट्रोलपंपापर्यंत रस्त्यावर एका बाजूचे काम सुरू असल्यामुळे सध्या या मार्गावरून एकेरी वाहतूक सुरू आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असून, वाहने सुसाट वेगाने जात असल्याने एखाद्यावेळी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे काम जलद गतीने करण्याची मागणी या भागातील नागरिकांसह वाहनधारकांकडून करण्यात येत आहे. तसेच गुडधी रेल्वेगेट समोरील अकोला ते मूर्तिजापूर या रोडचे काम सुरू असल्याने व आता पावसाळा असल्याने या मार्गावरील गावातील नागरिकांनाही मोठ्या अडचणीचा सामना करावा लागणार आहे.

# अवैध दारू विक्रेत्यांवर उत्पादन शुल्क विभागाचा प्रहार; २ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १४ जून

**अकोट :** अकोट तालुक्यातील अवैध दारू विक्री व वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करत एकाच दिवशी चार ठिकाणी छापे टाकून सुमारे २ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एक दुचाकी वाहन, अवैध देशी दारूचा साठा तसेच साहित्य जप्त करण्यात आले पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक सीमा झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक प्रमुख प्रमोद कांबळे यांच्या नेतृत्वात ही विशेष मोहीम राबविण्यात आली. पहाटे सुमारे ५ वाजल्यापासून गांधीग्राम, पोपटखेड आणि अकोली जहागीर परिसरात सापळा रचून कारवाया करण्यात आल्या. या धाडसत्रात अवैध देशी दारूची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान विविध ठिकाणांहून मद्यसाठा, वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी दुचाकी तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. संबंधित आरोपींविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

अकोट तालुक्यात अवैध दारू विक्री व पुरवठ्याच्या वाढत्या प्रकारांमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

# शहरात आज अडीच कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी १४ जून

**हिवरखेड :** नगरपरिषद अंतर्गत आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या विकास निधीतून व प्रयत्नांतून येथे २ कोटी ६३ लक्ष रुपयाच्या विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आज १४ जून रोजी सदाशिव संस्थान येथे आयोजित केला आहे. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाकळे हे राहणार असून अध्यक्षस्थानी भाजपाचे अकोला जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर हे राहणार आहेत.

तर प्रमुख उपस्थितीत हिवरखेडच्या नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे तथा उपाध्यक्ष प्रतिभा वीरेंद्र येऊल यांच्यासह हिवरखेड नगर परिषदेच्या गटनेत्या वैशाली गणेश वानखडे, सभापती वंदना राजेश वानखडे, प्रमिला रविंद्र मानकर, वैभव गावंडे, अजिज खा जमीर खा, तथा नगरसेवक दिपाली संदिप इंगळे, सविता सुनील इंगळे, जयश्री महादेव गावंडे, नादिया अंजुम नसीम खान, रुबीनाज अब्दुल सलमान, दीपक रायबोले, दानिश खा रसूल खा, प्रथमेश नाठे, हापिज आजम खा सुभेदार खा, किरण सेदानी हिवरखेड मंडळाध्यक्ष वैभव पोटे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष सुदाम राऊत यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. सदर विकास कामे शहरातील विविध प्रभागात होत असून यामध्ये सदाशिव संस्थान येथे १ कोटी रुपयांचे नमो उद्यान, प्रभाग क्रमांक ६ मध्ये वैष्णव किराणा ते गजानन भगत यांच्या घरापर्यंत २३ लक्ष रुपयांचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ८,१० मध्ये मुन्नाभाई मीरसाहेब ते मुदस्सीर अली यांच्या घरापर्यंत २३ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ९ मध्ये जुनी ग्रामपंचायत ते अनिकेत लोणकर यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ४ मध्ये दीपक राजनकर हे अतुल नाठे यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, १६ लक्ष रुपयाची नगरपरिषद कार्यालयाचे दुरुस्ती तथा साहित्य खरेदी, सदाशिव संस्थान येथे १७ लक्ष रुपयांच्या जलकुंभाचे बांधकाम, प्रभाग क्रमांक ८ मध्ये दीपक राऊत ते किरण हागे यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ३ मध्ये गणेश ओंकारे ते रुपेश काळे यांच्या घरापर्यंत १० लक्ष रुपयाचा पेव्हर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ७ मध्ये अब्दुल लाखा ते आसिफ खान यांच्या घरापर्यंत ६ लक्ष रुपयाचा पेव्हर ब्लॉक रस्ता, हिवरखेड नगरपरिषद फिल्टर प्लांट येथे २७ लक्ष रुपयाची दुरुस्ती, रंगरंगोटी, वाळू बदल, व हाय मास्टर लाईट बसविणे असा एकूण २ कोटी ६३ लक्ष रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आयोजित केला आहे तसेच तसेच कार्यक्रमा दरम्यान घरकुल लाभार्थ्यांना देखील परवानग्या वाटप करण्यात येणार आहेत. सोहळ्याला भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, गावकऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शहर भाजपाने केले आहे.

# गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने एलसीबी प्रमुख नितीन लेव्हरकर यांचा सत्कार



प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** स्थानिक गुन्हे शाखा निरीक्षक नितीन लेव्हरकर यांचा डाबकी रोडवरील गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. अशोक ओळंबे, गजानन घोंगे, ॲड. संतोष गोळे, राजाभाऊ देशमुख, गजानन गोलाईत, गजानन मोरे, अरुण मानकर, अमोल हिंगणे, मनीष खर्चे यांच्यासह गुड मॉर्निंग ग्रुपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक गुन्हे शाखाप्रमुख शेळके यांची पदोन्नतीवर बदली झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागी नितीन लेव्हरकर यांची नियुक्ती झाली.

# खंडणीसाठी तेल्हारा येथे व्यापाऱ्याला मारहाण, जिवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी १४ जून

**तेल्हारा :** येथील व्यापारी विनोद रमेशलाल बजाज यांना खंडणीसाठी मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या देण्याचा गंभीर प्रकार घडला आहे.

त्यामुळे सदर व्यापाऱ्यासह अनेक व्यापाऱ्यांचा जमाव पोलीस स्टेशन तेल्हारा येथे गोळा झाला असून तशी फिर्याद देण्यात आली आहे. गुन्हेगारीच्या बाबतीत तेल्हारा शहराची वाटचाल बिहार व यूपीच्या दिशेने तर होत नाही ना असा प्रश्न व्यावसायिकांना



पडला आहे. कोणताही दोष नसताना कोणीही गुंड प्रवृत्तीची व्यक्ती व्यापाऱ्यांना येऊन मारहाण करत असेल तर कायदा व सुव्यवस्थेसाठी ही चिंताजनक बाब आहे.

अनेक व्यापाऱ्यांच्या उपस्थितीत विनोद बजाज यांनी तेल्हारा ठाणेदारांकडे फिर्याद देऊन आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. आरोपीवर कठोर कारवाई न झाल्यास व्यावसायिकांतर्फे तेल्हारा बंदची हाक देण्याचा विचार सुरू असल्याची चर्चा आहे. तेल्हाराचे नवीन ठाणेदार हे प्रकरण कशाप्रकारे हाताळतात व पीडित व्यक्तीला न्याय मिळवून देतात का याकडे व्यापारी बांधवांचे लक्ष लागले आहे.

## गुडधी ते मोठी उमरी एकेरी वाहतूक धोकादायक

**अकोला :** गुडधी ते मोठी उमरीतील पेट्रोलपंपापर्यंत रस्त्यावर एका बाजूचे काम सुरू असल्यामुळे सध्या या मार्गावरून एकेरी वाहतूक सुरू आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असून, वाहने सुसाट वेगाने जात असल्याने एखाद्यावेळी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे काम जलद गतीने करण्याची मागणी या भागातील नागरिकांसह वाहनधारकांकडून करण्यात येत आहे. तसेच गुडधी रेल्वेगेट समोरील अकोला ते मूर्तिजापूर या रोडचे काम सुरू असल्याने व आता पावसाळा असल्याने या मार्गावरील गावातील नागरिकांनाही मोठ्या अडचणीचा सामना करावा लागणार आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा महापौरांच्या हस्ते गौरव

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** खडकी भागात वास्तव्यास असलेल्या बहीण भावंडांनी आपल्या हलाखीच्या परिस्थिती असूनसुध्दा उल्लेखनीय यश संपादन केले. चांदूर येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता सहावीत शिक्षण घेणारा जय विनोद वानखडे याने स्नॉट ऑलिम्पियाडतर्फे आयोजित परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच त्याची बहीण वैष्णवी



वानखडे हिने जिल्हास्तरीय गणित परीक्षेत यश मिळवून परिस्थितीवर मात करुन आई-वडिलांचे नाव उज्ज्वल केले आहे. स्नॉट ऑलिम्पियाड अंतर्गत विविध विषयांच्या परीक्षांमध्ये जय वानखडे याने राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत मानाचा तुरा रोवला आहे. तर वैष्णवी वानखडे हिने जिल्हास्तरावर गणित विषयात उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. यासाठी महापौर शारदा खेडकर यांच्या हस्ते दोन्ही विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना रोख बक्षीसाने सन्मानित करण्यात आले. या परीक्षांमध्ये शाळेच्या एकूण ६३ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असून, या दोन विद्यार्थ्यांनी हलाखीची परिस्थिती असूनसुध्दा उल्लेखनीय यश संपादन केले. यावेळी राजेश सोनाग्रे, गोपाल बाहेकर, पुर्णाजी पाटील, रविंद्र शिंदे आदींची उपस्थिती होती.

# बेपत्ता युवकाचा अखेर मृतदेह आढळला

प्रतिनिधी १४ जून

**मूर्तिजापुर :** माना येथे मारवाडी पुरा येथे राहणारा मंगेश दिगांबर चारथळ ४५, हा ११/०६/२०२६ रोजी रात्री घरातून दुकानात सामान आणण्यासाठी जात असल्याचे सांगून निघून गेला होता. त्यानंतर तो घरी परत न आल्याने त्याचा सर्वत्र शोध घेण्यात येत होता. १३/०६/२०२६ रोजी सकाळी एजाज भाई यांच्या शेतातील विहिरीमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला. सदरची माहिती मिळताच माना पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला.

प्राथमिक पाहणीत युवकाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे दिसून येते. याप्रकरणी पोलीस स्टेशन माना येथे आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली. ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ राहुल देवीकर व पो. कॉ. राणे तपास करीत आहेत. युवक बेपत्ता झाल्यामुळे कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला परंतु अखेर त्याचा मृतदेह सापडला.

# विश्वबंधुत्वाकरताच संतांनी दिली काल्याची शिकवण

## ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी १४ जून

**अकोट :** प्रत्येक सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होते आणि ही परंपरा सर्व वारकरी संतांनी प्रारंभीली आहे. यातील मुख्य उद्देश विश्वबंधुत्व व सर्वेक्य असल्याचे प्रतिपादन.ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांनी केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, त्श्रीक्षेत्र श्रद्धासागर, आकोट द्वारा आयोजित श्रींचा तीर्थक्षेत्रिय सप्ताह श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिर, श्रीक्षेत्र पैठण येथे झाला. या सप्ताहाच्या सांगतेप्रसंगी काल्याचे कीर्तनातून ते बोलत होते. काल्याच्या कीर्तनात कीर्तनकाराला विशिष्ट आचारसंहितेतूनच भगवान श्रीकृष्णाच्या बाळ क्रीडांचे वर्णन करण्याचा संकेत वारकरी संप्रदायामध्ये सर्व श्रेष्ठांनी दिलेला आहे. भगवान श्रीकृष्णांच्या चरित्रामध्ये ठिकठिकाणी दिलेले दिव्य संदेश या



ठिकाणी विषद करताना त्यांनी 'शिदोऱ्यांचा करू काला, एक वाटती एकाला' या न्यायाने आपसातील भेदभाव, मतभेद नष्ट करण्याचा दिव्य संदेश यातून सर्व जगाला मिळत असल्याचे सांगून श्री क्षेत्र पैठण येथील महात्म्य वर्णन करताना त्यांनी माऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत एकनाथ महाराज यांच्या चरित्र प्रसंगांचे वर्णन सुध्दा केले.

यावेळी श्री संस्थेचे अध्यक्ष वासुदेवराव महाराज महल्ले यांनी सप्ताहाच्या यशस्वीतेकरिता परिश्रम घेणाऱ्या सर्व सदभक्त, अन्नदाते व श्री संत एकनाथ महाराज संस्थान यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. कीर्तनकार ज्ञानेशप्रसाद महाराजांचा यांनी श्री नाथ महाराजांचे वंशज प्रमोद महाराज गोसावी यांनी तसेच ७ दिवस ज्ञानेश्वरी व भावार्थरामायण निरुपणाबद्दल उमेश महाराज मोहोकार यांचा वासुदेवराव महाराज महल्ले यांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास महाराज मानकर यांनी केले. कार्यक्रमाला श्री संस्थेचे विश्वस्त मंडळाचे महादेव ठाकरे, पुरुषोत्तम लाजुरकर, रवींद्र वानखडे, अविनाश गावंडे, अशोकर पाचडे अनिल कोरपे, गजानन दुथाट, केशवप्रसाद राठी यांसह विष्णु म. गावंडे, आत्माराम म. वाकोडे, ऋषि म. सोनोने, बालाजी म. तिडके, श्रीकांत म. कुकडे, गणेश म. काळे, ज्ञानेश्वर म. डांगरे, विष्णु म. मोहोकार, देविदास म. काळे, मदन म. मोहोकार, महेश म. मोहोकार, नंदकिशोर म. लांजुळकर, आदी मंडळी उपस्थित होती. हिंगणी येथील महिला सेवाधारी मंडळी यांच्या निरपेक्ष सेवेबद्दल सौ लताताई सुरेंद्र चिकटे यांनी त्यांचा साडी-चोळी देऊन सत्कार केला. महाप्रसाद कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता झाली. पुढील वर्षी श्री क्षेत्र अयोध्या येथे तीर्थक्षेत्रिय सप्ताह करण्याची उपस्थित भाविकांनी मागणी केली.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १४ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# धारदार शस्त्राने नर्सची हत्या

## दोन तासांत आरोपी पोलिसांच्या ताब्यात : नर्समधील जुन्या वादातून घटना

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** दोन नर्समध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. त्यापैकी एका नर्सच्या मुलाने दुसऱ्या नर्सवर धारदार शस्त्राने वार करुन हत्या केली. शहरातील श्रोती हॉस्पिटल परिसरात शनिवारी दुपारी 4.30 वाजताच्या सुमारास घडलेल्या खूनप्रकरणातील आरोपीला अवधूतवाडी पोलिसांनी अवघ्या दोन तासांत ताब्यात घेतले.



कुसुम महादेव चांदेकर (वय ४५, रा. श्रोती हॉस्पिटल परिसर) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हिमांशू रवींद्र भगत (वय २३, रा. श्रोती हॉस्पिटल परिसर) याने दुपारी सुमारे ४ ते ४.३० वाजताच्या दरम्यान तिच्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात चांदेकर यांचा मृत्यू झाला.

प्राथमिक तपासात मृत महिला आणि आरोपीची आई या दोघीही एकाच रुग्णालयात नर्स म्हणून कार्यरत असल्याचे समोर आले आहे. त्यांच्यात मागील दोन ते तीन महिन्यांपासून किरकोळ कारणांवरून वाद सुरू होता. या वादातूनच खूनाची घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला. तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी हिमांशू भगत याला अवघ्या दोन तासांत शोधून ताब्यात घेतले.

पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चावरे यांचे पथक तसेच अवधूतवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कदम व डीबी पथकाने ही कारवाई केली.

या प्रकरणाचा पुढील तपास अवधूतवाडी पोलीस ठाणे करीत असून आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# देहव्यापार अड्ड्यावर छापा; दोन महिलांची सुटका

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** शहरातील वैभवनगर परिसरात सुरू असलेल्या देहव्यापार अड्ड्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने शुक्रवारी छापा टाकून दोन महिलांची सुटका केली. या प्रकरणी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला वैभवनगर परिसरात देहव्यापार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तसेच एका महिलेला ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी लोहारा पोलिस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार (प्रतिबंधक) कायदा, १९५६ च्या कलम ३, ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ तसेच प्र. पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय खंडारे व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने केली.

# अवैध खतनिर्मितीचा पर्दाफाश

## २४.७३ लाखांचा खतसाठा जप्त; तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत परवानगीविना खतनिर्मिती व साठवणूक सुरू असल्याचा प्रकार कृषी विभागाच्या तपासणीत उघडकीस आला. या प्रकरणात पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून २४ लाख ७३ हजार ४५० रुपयांचा खतसाठा जप्त केला आहे.



कृषी अधिकारी संजय अनंत पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, एमआयडीसी लोहारा येथील ओम ॲग्रो सेंद्रिय या कंपनीत अनधिकृतपणे खताचे उत्पादन सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार कृषी विभागाच्या पथकाने पंचांसमक्ष पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात खताचा साठा आढळून आला.

तपासणीदरम्यान 'पोटॅश डिराइव्ह्ड फ्रॉम मोलॅसेस (भुमिधन)' या नावाने विक्रीसाठी तयार ठेवलेल्या १,७२० गोण्या (प्रत्येकी ५० किलो) सापडल्या. या साठ्याची किंमत २० लाख ६४ हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या बॅचमधील ४३१ गोण्या (प्रत्येकी ५० किलो) जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत ४ लाख ९ हजार ४५० रुपये आहे. एकूण २,१५१ गोण्या म्हणजेच १०७.५५ मेट्रिक टन खतसाठा जप्त करण्यात आला.

या प्रकरणी गजानन सुरेश टोटे (वय ५१), अविनाश वसंतराव दुधे (वय ३८) आणि जसवंत सिंग गिल (वय ५०, सर्व रा. यवतमाळ) यांच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, भारतीय न्याय संहिता तसेच रासायनिक खत नियंत्रण आदेशातील विविध कलमांन्वये शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक रोहित चौधरी, नकुल रोडे आणि पवन चिरडे करीत आहेत.

# ढाबा चालकावर हल्ला; दोन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** पांढरकवडा मार्गावरील 'चाचा का ढाबा'चे संचालक सुनील महादेव पाली यांच्यावर कोयत्याने हल्ला करून सोन्याची अंगठी लुटणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत अटक केली. आरोपींकडून लुटीतील सोन्याची अंगठी व चोरीस गेलेली पाण्याची मोटार असा एकूण १ लाख १३ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



सतीश ऊर्फ शेंबड्या ऊर्फ मुंगश्या बाबाराव मडावी (रा. राळेगाव, सध्या लोहारा, यवतमाळ) आणि शेख समीर ऊर्फ छोट्या शेख इसराईल (रा. बेंडकीपुरा, यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे. १३ जून रोजी दुपारी सुनील पाली (वय ५५) हे त्यांच्या शेतात असताना दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने वार करून जखमी केले. त्यानंतर त्यांच्या हातातील सुमारे सात ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने हिसकावून आरोपी फरार झाले. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी तातडीने तपास पथक रवाना केले. गोपनीय माहितीच्या आधारे सतीश ऊर्फ शेंबड्या ऊर्फ मुंगश्या बाबाराव मडावी (रा. राळेगाव, सध्या लोहारा, यवतमाळ) आणि शेख समीर ऊर्फ छोट्या शेख इसराईल (रा. बेंडकीपुरा, यवतमाळ) यांना ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत दोघांनी लुटमारीची कबुली दिली. तसेच त्याच दिवशी सकाळी पांढरकवडा मार्गावरील शेतातून पाच एचपी क्षमतेची पाण्याची मोटार चोरी केल्याचेही उघड झाले. या दोन्ही गुन्ह्यांतील चोरीचा संपूर्ण मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, आरोपी सतीश मडावी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी महाराष्ट्र प्रतिबंधक कायद्यांतर्गत (एमपीडीए) कारवाई करण्यात आली होती. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे, उपनिरीक्षक सागर इंगळे तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि सायबर पोलीस ठाण्याच्या पथकाने केली. पुढील तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहेत.

# औषध वितरणात भेदभावाचा आरोप; 'वन नेशन, वन ड्रग पॉलिसी'ची मागणी

प्रतिनिधी १४ जून

**पुसद :** राज्यातील औषध वितरण व्यवस्थेत कथित भेदभाव होत असल्याचा आरोप करत सर्व परवानाधारक औषध विक्रेत्यांना समान दराने व समान अटींवर औषध पुरवठा करण्यासाठी 'वन नेशन, वन ड्रग पॉलिसी'ची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुसद येथील श्री लक्ष्मी एजन्सीजचे संचालक कृष्णा बनगीनवार यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनानुसार, काही औषध उत्पादक कंपन्या व स्टॉकिस्टांकडून महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन (एमएससीडीए) सदस्यांना प्राधान्य दिले जात असून, संघटनेचे सदस्य नसलेल्या परवानाधारक औषध विक्रेत्यांना ग्राहक कोड सुरू करून देण्यास किंवा माल पुरवठा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे बाजारातील स्पर्धा कमी होत असून स्वतंत्र विक्रेत्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या 'वन नेशन, वन लायसन्स' धोरणानुसार एका राज्यात वैध असलेला औषध विक्री परवाना देशभर ग्राह्य धरला जातो. अशा परिस्थितीत कोणत्याही खाजगी संघटनेच्या सदस्यत्वाच्या आधारे औषध पुरवठ्यात भेदभाव करणे योग्य नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काही ठिकाणी 'अंडरकटिंग'च्या माध्यमातून एमएससीडीए सदस्यांना कमी दरात तर इतर विक्रेत्यांना अधिक दराने औषध पुरवठा केला जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व औषध कंपन्या व स्टॉकिस्टांनी सदस्यत्वाचा विचार न करता सर्व परवानाधारक विक्रेत्यांना समान दराने व समान अटींवर औषध पुरवठा करावा, तसेच एफडीसी, मॅनकाइंड, मेडले यांसारख्या कंपन्यांच्या सीएफए किंवा डेपो स्तरावर नॉन-एमएससीडीए विक्रेत्यांचे कोड सुरू करण्यास नकार देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील कथित अंडरकटिंग व कार्टेलच्या प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा भारतीय स्पर्धा आयोग (सीसीआय) तसेच केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

### १५ दिवसांचा अल्टिमेटम

- औषध वितरण व्यवस्थेतील कथित संगनमतामुळे सर्वसामान्य रुग्ण व ग्राहकांचे नुकसान होत असल्याचा आरोप करत प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. या कालावधीत कारवाई न झाल्यास स्पर्धा आयोग (सीसीआय) व केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच तक्रारीच्या प्रती अन्न व औषध प्रशासन आयुक्त, मुंबई आणि नागपूर विभागीय कार्यालयालाही पाठविण्यात आल्या आहेत.

### काय आहे प्रकरण?

- श्री लक्ष्मी एजन्सीज ही महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाची अधिकृत घाऊक औषध विक्री परवानाधारक संस्था आहे. वैध परवाने असतानाही काही औषध उत्पादक कंपन्या व वितरकांकडून संघटनेच्या सदस्य नसलेल्या व्यापाऱ्यांना ग्राहक कोड देण्यास नकार दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कृत्रिम मक्तेदारी निर्माण होऊन स्पर्धा कमी होत असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

# बोरी शिवारात वादळाने सोलर पॅनलचे नुकसान

प्रतिनिधी १४ जून

**उमरखेड :** तालुक्यातील बोरी (चातारी) शिवारात गुरुवारी (दि. १२ जून) रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास आलेल्या जोरदार वादळ व पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या वादळात एका शेतकऱ्याच्या कृषी पंपासाठी बसविण्यात आलेले सोलर पॅनल उखडून जमिनीवर कोसळल्याने त्याचे संपूर्ण नुकसान झाले आहे.

बोरी (चातारी) येथील महिला शेतकरी शितल संजय माने यांच्या सर्वे क्रमांक १६/१ मधील शेतात कृषी पंपासाठी सोलर पॅनल बसविण्यात आले होते. मात्र, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे हे पॅनल उडून जाऊन जमिनीवर आपटले. त्यामुळे सोलर यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून कृषी पंपही बंद पडला आहे.



या घटनेमुळे शितल माने यांचे आर्थिक नुकसान झाले असून पिकांना पाणीपुरवठा करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर कृषी पंप बंद पडल्याने पिकांच्या सिंचनाबाबत चिंता वाढली आहे. संबंधित विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी शितल माने यांनी केली आहे.

दरम्यान, परिसरात झालेल्या वादळी पावसामुळे काही ठिकाणी शेतीपिके व कृषी उपकरणांचेही नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. प्रशासनाने तातडीने पाहणी करून बाधित शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर बडगा; ७७ वाहनांवर कारवाई

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** जिल्ह्यात वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत असून, बस स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाच्या निर्देशानुसार आणि आगार व्यवस्थापकांच्या मार्गदर्शनाखाली ५ ते १५ जूनदरम्यान विशेष धडक मोहीम राबविण्यात येत आहे.



महागाव बस स्थानकासह विविध बसस्थानकांच्या २०० मीटर 'नो पार्किंग झोन' परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे. यवतमाळ–पांढरकवडा, यवतमाळ-धामणगाव आणि यवतमाळ–दारव्हा मार्गांवर खासगी ट्रॅव्हल्स, चारचाकी आणि तीनचाकी वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले आहे.

बसस्थानक परिसरात खासगी वाहतूकदारांचे प्रतिनिधी प्रवाशांना कमी भाड्याचे आमिष दाखवून प्रवासासाठी आकर्षित करीत असल्याने एसटी महामंडळाच्या प्रवासी संख्येत आणि उत्पन्नात घट होत असल्याची बाब समोर आली आहे. अवैध प्रवासी वाहतूक हा एसटीच्या उत्पन्नातील घसरणीमागील प्रमुख घटक असल्याचे निरीक्षण मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान नोंदविल्याचे सांगण्यात आले.

या पार्श्वभूमीवर अवैध प्रवासी वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी महामंडळाने विशेष मोहीम हाती घेतली असून, आतापर्यंत जिल्ह्यात ७७ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. पुढील काही दिवसांतही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून, नियमबाह्य वाहतुकीविरोधातील कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# बारा वर्षांचा दावा : 'विकसित भारता'च्या वाटचालीचा भाजपकडून लेखाजोखा

## मोदी सरकारच्या कामगिरीवर पत्रकार परिषद; कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा आणि आर्थिक प्रगतीचा उल्लेख

प्रतिनिधी १४ जून

**यवतमाळ :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पक्षाने रविवारी पत्रकार परिषद घेऊन विविध योजनांची अंमलबजावणी, पायाभूत सुविधांतील वाढ आणि आर्थिक प्रगतीचा आढावा सादर केला. विकसित भारताच्या संकल्पनेला या कालावधीत बळ मिळाल्याचा दावा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.




पत्रकार परिषदेत देशातील २२ राज्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीची (एनडीए) सत्ता असून देशातील सुमारे ८० टक्के लोकसंख्या एनडीए शासित राज्यांमध्ये राहत असल्याचे सांगण्यात आले. मोदी सरकारच्या काळात २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आले, ८१ कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्याचा लाभ मिळाला आणि जनधन योजनेअंतर्गत ५८ कोटी बँक खाती उघडण्यात आल्याचा दावा करण्यात आला.

आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, किसान सन्मान निधी, स्वनिधी योजना, विश्वकर्मा योजना आणि 'लखपती दीदी' अभियानाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना थेट लाभ पोहोचल्याचे नमूद करण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी गॅस जोडण्या, सुकन्या समृद्धी योजना, सैन्यातील वाढता सहभाग तसेच स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांचा उल्लेख करण्यात आला.

देशातील महामार्ग, रेल्वे, मेट्रो, विमानतळ, वंदे भारत रेल्वे, भारतनेट आणि डिजिटल इंडिया उपक्रमांमुळे पायाभूत सुविधांमध्ये मोठी झेप घेतल्याचा दावा करण्यात आला. तसेच जीएसटी संकलन, यूपीआय व्यवहार, 'मेक इन इंडिया', मोबाईल उत्पादन, संरक्षण क्षेत्र आणि स्टार्टअप परिसंस्थेत भारताने उल्लेखनीय प्रगती साधल्याचे सांगण्यात आले.

राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक प्रकल्प, कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय, अटल सेतू आणि विविध पायाभूत प्रकल्पांचा उल्लेख करत हे निर्णय सरकारच्या दीर्घकालीन विकासदृष्टीचे प्रतीक असल्याचे भाजपने म्हटले.

देशाच्या अर्थव्यवस्थेने नव्या उंची गाठल्याचा दावा करत सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर ७.७ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे तसेच उद्योग, सेवा, वित्तीय, उत्पादन आणि वाहतूक क्षेत्रांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले.

या पत्रकार परिषदेला आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल चौहान, जिल्हा महामंत्री राजू पडगीलवार, रेखा कोठेकर, देवानंद पवार, शंतनू शेटे आणि दत्ता राहणे उपस्थित होते.

# अवैध रेती वाहतुक; ट्रॅक्टर जप्त

## ४.०६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी १४ जून

**उमरखेड :** अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत पिवळी रेती वाहून नेणारा ट्रॅक्टर जप्त केला. या कारवाईत ट्रॅक्टरसह रेती असा ४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील अवैध धंदे, अवैध शस्त्र बाळगणे आणि अवैध उत्खननाविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ११ जून रोजी उमरखेड उपविभागात पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी उमरखेड-विडुळ मार्गावरून एका ट्रॅक्टरमधून विनारॉयल्टी पिवळी रेती वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी चुरमुरा फाटा परिसरात सापळा रचला. काही वेळात संशयित ट्रॅक्टर तेथे येताच त्याची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रॅक्टरमध्ये अवैधरीत्या पिवळी रेती वाहतूक होत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टर व रेती असा एकूण ४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी बबलू मारोती देवकर (रा. भगतसिंग वॉर्ड, उमरखेड) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४८ (८) व ४७ (७) अन्वये उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. जिल्ह्यात अवैध उत्खनन आणि वाहतुकीविरोधातील मोहिम पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. १४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती महाविद्यालयात मेगा कॅम्पस ड्राइव

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप व्दारे संचालित, पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती येथे अँडवांटमेड एल एल पी, अहमदाबाद या मेडीकल कोडींग क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनी ने सहभाग घेतला.

या कॅम्पस ड्राइव्ह मध्ये अमरावती सह संपूर्ण महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र बाहेरील बी. फार्मसी , एम. फार्मसी व फार्म डी झालेल्या ६७८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

सदर कार्यक्रमात अँडवांटमेड इंडिया एल एल पी, अहमदाबाद यांच्या तर्फे श्री हेमांग क्रिस्टियन ,श्री पूर्वेश जानी आणि त्यांची चमू यांनी मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाच्या तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. दिप्ती रूईकर यांनी 'औषधनिर्माण क्षेत्रातील संधी व आव्हाने ' यावर मार्गदर्शन केले.

# अमरावतीतील कंत्राटी सफाई कामगारांचे प्रश्न गंभीर

## प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा

प्रतिनिधी १४ जून



**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेच्या विविध झोनमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आज सकाळी ६ ते १०.३० वाजेपर्यंत काम बंद आंदोलन केले. नवसारी, गाडगेनगर, अंबागेटसह शहरातील अनेक भागांतील स्वच्छता सेवा या काळात प्रभावित झाली. या आंदोलनामुळे शहरातील कंत्राटी सफाई कामगारांच्या गंभीर समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आल्या आहेत.

कामगारांच्या म्हणण्यानुसार, स्वच्छता सेवा पुरविणाऱ्या कोणार्क कंपनीकडून अनेक कामगारांना नियमित व वेळेवर वेतन दिले जात नाही. काही कर्मचाऱ्यांच्या पगारात तफावत असून काहींना अद्याप पूर्ण वेतन मिळालेले नाही. किमान वेतन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत.

याशिवाय, कामगारांना आवश्यक सुरक्षा साहित्य, आरोग्य संरक्षण, विमा सुविधा, हातमोजे, मास्क, बूट तसेच इतर मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. दररोज शहर स्वच्छ ठेवण्यासाठी घाण, दूषित वातावरण आणि विविध आरोग्यविषयक धोक्यांचा सामना करणाऱ्या या कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

कामगारांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. ज्या भागात ५० कामगारांची आवश्यकता आहे, तेथे प्रत्यक्षात निम्म्याच कामगारांकडून काम करून घेतले जात असल्याने उर्वरित कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत आहे. आवश्यक वाहने, साधनसामग्री आणि मनुष्यबळाची कमतरता असल्याने स्वच्छता व्यवस्थेवरही परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. आंदोलनादरम्यान मनपा प्रशासन, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी आणि काही लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मात्र, कामगारांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय किंवा हमी मिळाली नसल्याची भावना आंदोलनकर्त्यांमध्ये दिसून आली. त्यामुळे कामगारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई कामगारांना न्याय, सन्मान, सुरक्षितता आणि किमान वेतन मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि संबंधित कंपनी यांनी परस्पर जबाबदारी झटकण्याऐवजी या प्रश्नांवर तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे.

आज एक सामान्य नागरिक म्हणून माझा प्रश्न आहे की, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणाऱ्या या कंत्राटी सफाई कामगारांचा वाली कोण? त्यांच्या हक्कांसाठी आणि सुरक्षेसाठी ठोस भूमिका कोण घेणार?

अमरावती महानगरपालिका प्रशासन, संबंधित कंपनी आणि शासनाने या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# विहिगावात थरारक प्रकार; वृद्ध शेतकऱ्याचे हातपाय बांधून जबरदस्तीने विष पाजल्याने वृद्ध गंभीर

## जुन्या वादातून घडली धक्कादायक घटना; रहिमापूर पोलिसांकडून तपास सुरू

प्रतिनिधी १४ जून

**दर्यापूर:** अंजनगाव तालुक्यातील रहिमापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम विहिगाव परिसरात मानवी संवेदनांना हादरवून सोडणारी एक गंभीर घटना समोर आली आहे. शेतात काम करत असताना एका वृद्ध शेतकऱ्याचे हातपाय बांधून जबरदस्तीने विष पाजल्याचा आरोप काही व्यक्तींवर करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून कायदा व सुव्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विहिगाव येथील वृद्ध शेतकरी दादाराव अभ्यंकर हे आपल्या शेतात काम करत असताना निखिल गणेशे व त्याच्यासोबत असलेल्या अन्य तीन जणांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधितांनी वृद्धाचे हातपाय बांधून त्यांना जबरदस्तीने विष पाजल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, आरोपी आणि पीडित यांच्यातील जुना वाद या घटनेमागे कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. मात्र नेमके कारण काय आहे, याचा तपास पोलीस यंत्रणा करीत आहे. गंभीर अवस्थेत वृद्धाला उपचारासाठी अमरावती रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या प्रकरणाची नोंद रहिमापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. संबंधित आरोपींची चौकशी, घटनास्थळाचा पंचनामा तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविण्याचे काम सुरू असल्याचे समजते.

दरम्यान, एका वृद्ध व्यक्तीवर अशा प्रकारे कथित अत्याचार झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावातील अनेकांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून अशा घटनांमुळे ग्रामीण भागातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलीस तपासानंतरच घटनेमागील सत्य परिस्थिती स्पष्ट होणार असली तरी, वृद्ध व्यक्तीवर झालेल्या या कथित अमानुष प्रकाराने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

# महापालिकेच्या वतीने घुमेंतूचे अतिक्रमण काढण्याची कारवाई

प्रतिनिधी १४ जून



**अमरावती** : दिनांक,१३/६/२०२६ रोजी पुनश्च रात्री ८.०० वाजता पासून ते रात्री ११.०० वाजेपर्यंत पोलीस विभाग व अतिक्रमण विभागाद्वारे संयुक्तपणे घुमतुकाचे अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही नेहरू मैदान, रॉयली प्लॉट, रेल्वे स्टेशन परिसर,बस स्टॉप परिसर, राजकमल चौक, श्याम चौक, साबणपुरा परिसर,तहसील कार्यालय परिसर, शिवटेकडी परिसर, गर्ल हायस्कूल चौक, येथील २२,घुमंतुकाचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात आली असून त्यांना राजुराबेडा येथे सोडविण्यात आले आहे.

तसेच त्यांच्याद्वारे जमा करून ठेवण्यात आलेले १ ट्रक, तीन चाकी कटले, व इतर साहित्य, राजुराबेडा येथे परत करण्यात आले आहे.

# मेळघाटातील हरिसालमध्ये बिबट्याच्या कातडीसह तस्कर जेरबंद

प्रतिनिधी १४ जून



**धारणी :** मेळघाट परिसरातील वन्यजीवांच्या शिकारी आणि अवयवांच्या तस्करी विरोधात वाईल्ड लाईफ क्राईम सेलने एक मोठी आणि यशस्वी कारवाई केली आहे. धारणी तालुक्यातील हरिसाल नाका परिसरात रविवारी एका गुप्त माहितीच्या आधारे थरारक डिकॉय (बनावट ग्राहक) ऑपरेशन राबवून बिबट्याची कातडी विकणाऱ्या आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली. आरोपींच्या ताब्यातून वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अत्यंत संरक्षित असलेल्या बिबट्याची पूर्ण कातडी जप्त करण्यात आली आहे.वन्यजीव वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या या कारवाईची पार्श्वभूमी अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली होती. अनुसूची-१ मधील अतिसंरक्षित वन्यप्राणी असलेल्या बिबट्याची कातडी बेकायदेशीरपणे विकण्यासाठी काही तस्कर ग्राहक शोधत असल्याची पक्की माहिती वाईल्ड लाईफ क्राईम सेलला मिळाली होती. या माहितीची शहानिशा केल्यानंतर पथकाने तस्करांना पकडण्यासाठी तातडीने जाळे विणले. हरिसाल नाक्यावर रंगेहात पकडले तस्करांना संशय येऊ नये म्हणून सेलच्या अधिकाऱ्यांनी स्वतः बनावट ग्राहक बनून आरोपींशी संपर्क साधला. कातडीचा सौदा ठरल्यानंतर आरोपींनी धारणी येथील हरिसाल नाका परिसरात येण्याचे मान्य केले. ठरल्याप्रमाणे संशयित इसम कातडी घेऊन पोहोचताच, आधीच दबा धरून बसलेल्या वाईल्ड लाईफ क्राईम सेलच्या पथकाने पंचांसमक्ष त्यांना चारही बाजूंनी घेरून ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता, एका पोत्यात लपवून ठेवलेली बिबट्याची संशयास्पद कातडी आढळून आली, जी वनविभागाने तात्काळ जप्त केली.या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींविरुद्ध वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कडक तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेली कातडी नेमकी किती जुनी आहे आणि बिबट्याची शिकार कुठे करण्यात आली, हे शोधण्यासाठी ती फॉरेन्सिक प्रयोगशाळेत (तज्ज्ञांकडे) तपासणीसाठी पाठवण्यात येणार आहे.

**मेळघाटातील वन्यजीवांची शिकार** करणाऱ्या एखाद्या आंतरराज्यीय टोळीचा यात हात आहे का, तसेच या गुन्ह्यात आणखी किती लोकांचा सहभाग आहे, यादृष्टीने वनविभागाचे पथक पुढील तपास करत असल्याची माहिती गुगामल वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक किर्ती जमगाडे-कोकाटे यांनी दिली.

# सिटी कोतवाली येथे अट्टल गुन्हेगारांकडून १० मोटर सायकली जप्त

## ३ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी १४जून



**अमरावती :** सिटी कोतवाली येथे अटटल गुन्हेगारांकडून एकूण ३ लाख ६० हजार रू. किंमतीच्या एकूण १० मोटर सायकली जप्त केली. आयुक्तालयातील व इतरत्र पो.स्टे. अभिलेखावरील एकूण ०९ गुन्हे उघडकीस आणल्या बाबतची कार्यवाही करण्यात आली.

पो.स्टे. सिटी कोतवाली येथे दिनांक ०६/०५/२०२६ रोजी फिर्यादी नामे सागर प्रकाशराव वाकूडकर, वय ३४ वर्ष रा.देवी नगर वडाळी, अमरावती यांनी जबाणी रिपोर्ट दिला की, दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा चे सुमारास फिर्यादी यांचे चुलत मामे भाउ नामे शुभम विनायकराव गेडेकर हे कामानिमीत्त फिर्यादी यांचे मालकीची होन्डा कंपणीची युनिकॉर्न एम एच २७ सी पी १४८९ क्रमांकाची दुचाकी मोटर सायकल किं अं ४०,००० रू ची घेवून प्रभात चौक येथील पटेल यांचे घरी गेले होते. दरम्यान शुभम गेडेकर यांनी त्यांच्या ताब्यातील वरील नमूद मोटर सायकल ही नमूद ठीकाणी उभी करून लॉक केली होती. त्यानंतर शुभम गेडेकर हे काम आटोपून दुपारी अंदाजे ०३.३० वा चे सुमारास नमूद मोटर सायकल उभी केलेल्या ठीकाणी परत आले तर त्या ठीकाणी त्यांना वरील नमूद मोटर सायकल दिसून आली नाही. त्यावरून फिर्यादी व शुभम गेडेकर यांनी नमूद मोटर सायकलचा शोध घेतला असता त्यांना ती मिळून आली नाही. त्यावर फिर्यादी यांची सदर मोटर सायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याची खात्री झाल्याने त्याबाबत त्यांचे जबाणी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपीता विरोधात पो स्टे ला अप. नंबर. २१८/२६ कलम ३०३(२) बी एनएस प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला.

सदर गुन्हयाचा वरिष्ठांचे मार्गदर्शनाप्रमाणे तांत्रीक व गुप्तबातमीदाराकडून प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे सखोल तपास केला असता तपासादरम्यान सदरचा गुन्हा हा आरोपी राहूल संतोष सोळंके, वय २४ वर्ष, रा. मरीमाता मंदीर जवळ, माळीपूरा, कारंजा लाड जि. वाशिम,, लखन उत्तमराव चव्हाण, वय २६ वर्ष महादेव उत्तमराव चव्हाण, वय २८ वर्ष, क. २ व ३ रा. अळनगाव ता. भातकुली जि. अमरावती यांनी मिळून केला असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे निष्पन्न बाबी नूसार सदर आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांचे माध्यमातून गुन्हयाचा सखोल तपास केला असता दरम्यान नमूद आरोपीतांनी सदरचा गुन्हा केला असल्याची तसेच त्यांनी याप्रमाणेचे मोटर सायकल चोरीचे गुन्हे अमरावती शहरात व इतरत्र ठीकाणी केले असल्याची कबुली दिली. वरून तपासादरम्यान नमूद आरोपीतांकडून एकूण ०९ गुन्हे उघडकीस आणून त्यांचे कडून सदर गुन्हयातील तसेच इतर एका गुन्हयातील एकूण १० मोटर सायकली किं अं ३ लक्ष ६० हजार रू च्या जप्त करण्यात आल्या.

# गांधींजींच्या सेवाग्राम आश्रमात नशाबंदी मंडळ संघटकांची संवाद बैठक

## नशाबंदी मंडळ अमरावती जिल्हा संघटक म्हणून ज्ञानेश्वर जामनिक यांची नियुक्ती

प्रतिनिधी १४जून



**दर्यापूर :** नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्या महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन शुक्रवार ५ जून ते ७ जून पर्यंत यात्री निवास, सेवाग्राम आश्रम,जिल्हा वर्धा या स्थळी आयोजित करण्यात आली. या ठिकाणी संघटकाना २०२६-२७ ची मान्यता तसेच वर्षभरात संघटकांच्या कार्याचे नियोजन करण्यात आले. संघटकांना साहित्यात पोस्टर, पत्रक, महामानवाच्या विचारांचे पुस्तक, व्यसनमुक्ती वरील सापशिडी देण्यात आली. यावेळी संघटक बैठकीचे उद्घघाटन कल्याण यात्रा व वार्षिक कार्य अहवालच्या प्रदर्शनीचे नशाबंदी मंडळाचे अध्यक्ष माजी मुंबई विद्यापीठ कुलगुरू डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक/ चिटणीस अमोल मडामे, चिटणीस चंद्रकांत चौधरी, सदस्य बॉस्को डिसुझा, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष वर्धा चे डॉ. नितिका व त्याची टिम हे उपस्थित होते. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ६ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजन वेळूकर यांनी संस्था चालवतांना कशा पद्धतीने फंड गोळा केला पाहिजे त्यासाठी मंडळाचे प्रेझेंटेशन कसे असावे यावर मार्गदर्शन केले. तसेच नशाबंदी मंडळाच्या जिल्हा संघटक यांचे कौतुक केले त्यांना सूर्याची उपमा दिली. मंडळाला पुढील कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. सदर कार्यक्रमाची प्रस्ताविक नशाबंदी मंडळाचे मुख्य संघटक व चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी केले, तर वर्षभरात आपल्या जिल्ह्यात विशेष कार्यकेल्याबद्दल जिल्हा संघटक अर्पिता मुंबरकर यांना गोल्डन मेडल देऊन तर नागपूर जिल्हा संघटक गौरव आळणे यांना सिल्वर मेडल तर पालघर जिल्हा संघटक मिलिंद पाटील यांना ब्रान्स मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विभागीय संघटक प्रमुख म्हणून उत्तम काम केल्याबद्दल प्रथम क्रमांक पुणे विभाग प्रमुख अॅड. सुरेश संकटे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम तीन हजार रूपये तर दुसरा क्रमांक कोकण विभाग प्रमुख दिशा कळंबे व यांची टिम यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम दोन हजार रूपये देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. राजन वेळूकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. त्यानंतर नशाबंदी मंडळाचे ३६ संघटकानी आपला परिचय देऊन विभाग प्रमुखांची निवड करण्यात आली.

# अमरावती पोलिसांनी १८ लाखांचे १३३ मोबाईल शोधून केले परत

प्रतिनिधी १४ जून



**अमरावती :** अमरावती ग्रामीण पोलीस दलामार्फत नागरिकांचे गहाळ झालेले मोबाईल (ींम्दनी) हस्तगत करण्यासाठी निकेतन कदम (भा.पो.से), पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

सदर मोहिमेंतर्गत पोलीस स्टेशन सायबर, अमरावती ग्रामीण तसेच अमरावती ग्रामीण पोलीस घटकातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या गहाळ मोबाईल संदर्भातील तक्रारींची पोर्टलच्या माध्यमातून तांत्रिक विश्लेषण करून तपास करण्यात आला.

या विशेष मोहिमेदरम्यान एकूण १३३ गहाळ मोबाईल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले असून संबंधित मोबाईल मा. पोलीस अधीक्षक अपर पोलीस अधीक्षक व पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सायबर व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधीकारी यांच्या हस्ते त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईल फोनची एकूण किंमत अंदाजे १८,१८,०००/- इतकी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सायबर पोलिसांचे तांत्रिक कौशल्य तसेच सर्व पोलीस स्टेशनच्या समन्वयातून ही उल्लेखनीय कामगिरी ला यश प्राप्त झाले आहे. सदरची मोहीम मा.श्री निकेतन कदम (भा.पो.से), पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात अशोक लांडे, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सायबर अमरावती ग्रामीण यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन सायबर व अमरावती ग्रामीण घटकातील सर्व पो.स्टे चे अधिकारी व कर्मचारी यांनी पार पाडली. नागरिकांनी मोबाईल हरवल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा CEIR पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शहरातील अवैधरित्या शस्त्रे बाळगणाऱ्यांवर धडक कारवाई

## अमरावती शहर गुन्हेशाखेची कामगीरी

प्रतिनिधी १४ जून



**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांवर कार्यवाई करण्याचे आदेश दिलेवरून आज दिनांक १३/०६/२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व पोलीस निरीक्षक दिनेश दाहातोर्डे यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेचे पथकाने गुप्त माहीतीवरून आयुक्तालय हददीमध्ये केलेल्या कार्यवाई केली.

पो.स्टे. फेजरपुरा हद्दीतील हिन्दु स्मशान भुमी येथील गुणवंत बाब मंदीर समोरे आरोपी महेश कृष्णा खोब्रागडे, वय २२ वर्ष, रा. लुबिंनी नगर, अमरावती हा हातामध्ये घातक लोखंडी वाकु घेवुन गुन्हा करण्याच्या उददेशाने असताना त्यास ताब्यात घेवुन याचे ताब्यातून एक लोखंडी चाकु कि. ३१. १,०००/- रू जप्त करून त्यांचे विरूध्द पो.स्टे. फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पो.स्टे. फेजरपुरा हद्दीतील ऑक्सीजन पार्क समोर आरोपीअक्षय संजय गवई, वय २९ वर्ष, रा. जय सियाराम नगर, अमरावती हा ऑक्सीजन पार्क येथे हाता मध्ये लोखंडी वाकु घेवुन येणा-या जाणा-या लोकांना धाक दाखवुन दहशत पसरवीत असताना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु कि.अ. १,०००/- रू चा मिळुन आल्याने चाकु जप्त करून त्याचे विरुध्द पो.स्टे. फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पोस्टे नागपुरी गेट पो.स्टे. नागपुरी गेट हद्दीतील मसारगंज बगीच्या जवळ तडीपार आरोपी अहसान खान हसन खान, वय २३ वर्ष, रा. मूलीस्था नगर, अमरावती हा मसारगंज बगीच्या जवळ तडीपार आदेशाचे उलघंन करूण पोस्टे हददी मध्ये मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कर्बरेला एक लोखंडी चाकु कि.अ. १,०००/- रू चा मिळुन आल्याने चाकु जप्त करून त्याचे विरुध्द पो.स्टे. फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १४२, १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा (गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट ०१ चे प्रभारी पो. नि. दिनेश दहातोंडे, युनिट ०२ चे प्रभारी पो. नि. अतुल वर, यांच्या नेतृत्वात सपोनि, मनिष वाकोडे, सपोनि. महेश इंगोले, सपोनि दशरथ आडे, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश लोखंडे, मंगेश परिमल, आस्तिक देशमुख, संभाजी केंद्रे, जहीर शेख, सचिन बहाळे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, अतुल संभे, शांतनु बारोटकर यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि १४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## समस्याग्रस्त महिलांसाठी उद्या जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**वाशीम :** समस्याग्रस्त, पीडित व गरजू महिलांना त्यांच्या तक्रारी, अडचणी व समस्या थेट प्रशासनासमोर मांडता याव्यात तसेच त्यांचे प्रश्न शासकीय यंत्रणेमार्फत प्रभावीपणे सोडविता यावेत, यासाठी जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो.याअनुषंगाने जून महिन्यातील जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवार, १५ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे.या लोकशाही दिनात महिलांच्या विविध तक्रारी, कौटुंबिक समस्या, अत्याचार, न्याय मिळविण्यासंदर्भातील अडचणी तसेच इतर शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांवर संबंधित विभागांच्या माध्यमातून तातडीने कार्यवाही करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील समस्याग्रस्त, पीडित व गरजू महिलांनी आपल्या तक्रारी व निवेदने घेऊन या महिला लोकशाही दिनात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी केले आहे.

# अधिकाऱ्याची ‘मनमानी’, दररोज पाहिजे ‘दानापाणी’ !



## समाजकल्याण विभागाच्या मिनी ट्रॅक्टर खरेदी प्रकरणात लालची अधिकाऱ्याचे हात ‘बरबटलेले’

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

समाज कल्याण विभागामार्फत वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला ’एकाच’ कंपनीचे मिनी ट्रॅक्टर जबरीने खरेदी करण्यासाठी विद्यमान लालची अधिकाऱ्याने लाभार्थी महिला बचत गटावर दबावतंत्राचा वापर केल्याची चर्चा आहे. कार्यरत लालची अधिकारी दररोज ’दानापाणी’ देणाऱ्या ‘दात्याच्या’ शोधात असतो अशी समाज कल्याण विभागामध्ये चर्चा सुरू असते.म्हणूनच लालची अधिकाऱ्याने मिनी ट्रॅक्टर खरेदी प्रकरणात वाशीम व परिसरात असलेले जिल्हे सोडून २५० किलोमीटर अंतरावरील छत्रपती संभाजीनगरच्या ’मॅसे फर्ग्यूसन’ कंपनीच्या विक्रेत्यावर मेहेरबानी करून दलालीपोटी लाखो रूपयाचा मलिदा लाटल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. या अफलातुन प्रकारामुळे पुन्हा वाशीम जिल्ह्यातील समाज कल्याण विभागातील संगनमताने सुरू असलेला भ्रष्टाचार चव्हाट्यावर आला आहे.

शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत एस.सी.व एस.टी. प्रवर्गासह इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांचे जीवनमान उंचाण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजनेद्वारे विविध योजनांचा लाभ दिल्या जातो.यावर्षी वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला पुरक व्यवसायाच्या माध्यमातून समृद्ध होण्यासाठी शासनाने समाज कल्याण विभागामार्फत मिनी ट्रॅक्टर खरेदीसाठी निवड केली आहे.यामध्ये १० टक्के रक्कम महिला बचत गटाला भरावयाची



असून ९० टक्के रक्कम शासनाकडून अनुदान मिळणार आहे. वाशीम व परिसरातील अकोला, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, हिंगोली या जिल्ह्यामध्ये अनेक ट्रॅक्टर कंपनीचे अधिकृत विक्रेता आहेत. लाभार्थी महिला बचत गटाला कोणत्या कंपनीचा मिनी ट्रॅक्टर खरेदी करावयाचा ही त्या बचत गटाची ऐच्छिक बाब आहे.असे असतानाही स्थानिक विक्रेते डावलून चक्क २५० किलोमीटर अंतरावर असलेल्या छत्रपती संभाजीनगर मधील ’मॅसे फर्ग्यूसन’ कंपनी कडून मिनी ट्रॅक्टर खरेदी प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. वाशीम येथील जबाबदारी पार पाडणाऱ्या लालची अधिकाऱ्याने स्थानिक व परिसरातील अधिकृत ट्रॅक्टर विक्रेत्यांना एका मिनी ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपये दलाली म्हणून द्यावे लागतील अशी अफलातून अट टाकल्याची चर्चा आहे. या अटीची पूर्तता करण्यासाठी वाशीम व परिसरातील ट्रॅक्टर विक्रेत्यांनी नकार दिल्यामुळे भ्रष्टाचाराने बरबटलेल्या लालची अधिकाऱ्याने चक्क संभाजीनगर गाठून त्या विक्रेत्याकडून मलिदा लाटून त्याचे भरभराटीचे उद्दीष्ट साधून घेतल्याची जिल्ह्यात चर्चा आहे. जवळपास साडेतिन लाख रूपयाच्या आसपास किंमतीमध्ये मिळणाऱ्या मिनी ट्रॅक्टर विक्री करणारे विक्रेते त्यांचे वार्षिक उद्दीष्ट पूर्ण होण्यासाठी लाभार्थी बचत गटाला मिनी ट्रॅक्टरसोबत ट्रॉली आणि एक व्ही पास अथवा कल्टीव्हेटर फ्री म्हणून देतात. म्हणून स्थानिक व परिसरातील ट्रॅक्टर विक्रेत्यांनी वाशीमच्या भ्रष्ट अधिकाऱ्याला दलालीची रक्कम देण्यास नकार दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. वाशीम मधील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील महिला बचत गटाच्या ५० मिनी ट्रॅक्टर खरेदीचा व्यवहार संशयास्पद आसून लाभार्थी बचत गटाला सेवा व दुरूस्तीसाठी त्रासदायक ठरणारा आहे.अमरावती विभागीय समाज कल्याण आयुक्तांनी हा व्यवहार त्वरीत रद्द करुन लालची अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी.लाभार्थी महिला बचत गटाला स्थानिक अथवा परिसरातील विक्रेत्याकडून मिनी ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याची मागणी विविध स्तरातून होत आहे.

## थोडक्यात

### घोटा,हराळ,शेत शिवारात वादळी वाऱ्याने सोलर पॅनलचे नुकसान!



**●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●**

तालुक्यातील हराळ, घोटा, शिवारात १२ जूनचे रात्री १० वाजताचे सुमारास झालेल्या वादळाने शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या सोलर पॅनलचे अतोनात नुकसान झाले आहे. १२ जूनचे रात्री १० वाजताचे सुमारास हराळ, घोटा येथे जोरदार वादळासह पावसाला सुरुवात झाली. या वादळात शेतकरी विश्वनाथ सखाराम खाडे यांच्या शेत सर्व्हे नं. २६५गट क्रमांक या शेतीतील कृषी पंपाचा सोलर पॅनल उडून जाऊन जमिनीवर आपटल्याने संपूर्णतः नुकसान झाले. त्यामुळे आर्थिक नुकसान तर झालेच पण कृषी पंपाची मोटार बंद पडल्याने आता पिकांना कसे पाणी द्यावे या विवंचनेत शेतकरी विश्वनाथ खाडे आहेत.

# दरमहा हप्त्यापोटी कलेक्शन, सर्वच अवैध धंद्यांचे शेलुबाजार कनेक्शन !


*** शेलुबाजार परिसरात राशनमधून गरीबांचे शोषण, अवैध दारू, वरली मटका, गुटखा; केव्हा बसणार कारवाईचा चटका * पोलीस अधीक्षकांनी लक्ष देण्याची गरज**


**●सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार●**


नागपूर-मुंबई महामार्गावर असलेले शेलुबाजार हे सध्या अवैध धंद्यांचे हब बनले आहे. अनेक वर्षांपासून शेलुबाजारसह परिसरात सर्व प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा आहे. या अवैध धंद्यांना पूर्वीपासूनच मंगरूळपीर पोलीस स्टेशन तसेच वाशिम स्थानिक गुन्हे शाखेचे पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांमधून दरमहा लाखो रुपयांचा हप्ता मिळत असल्याने संबंधितांवर प्रभावी कारवाई होत नसल्याची चर्चा आहे. मंगरूळपीर पोलीस स्टेशन व त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या शेलुबाजार पोलिस चौकीकडून









हप्त्यापोटी कलेक्शन करून या धंद्यांना थेट संरक्षण दिले जात असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकाराला नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक आळा घालणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार पोलिस चौकी हद्दीत सध्या अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाल्याचे चित्र आहे. देशी-विदेशी दारू विक्री, अवैध वाहतूक, गुटखा, गांजा, वरली मटका व जुगार यांसारखे बेकायदेशीर व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.या संदर्भात यापूर्वीही वृत्त प्रसिद्ध झाले होते. मात्र परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसून येत नाही. त्यामुळे संबंधित प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामीण भागात दारू सहज उपलब्ध होत असल्याने अनेक कुटुंबांवर त्याचा परिणाम होत आहे. व्यसनामुळे घरखर्च, शेतीचे उत्पन्न व मजुरीचा पैसा खर्च होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी जुगाराचे अड्डे सुरू असल्याचेही बोलले जात आहे.वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी यापूर्वी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सर्व पोलीस ठाण्यांना याबाबत आदेशही देण्यात आले होते. मात्र शेलुबाजार परिसरात अवैध धंदे सुरूच असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी कारवाई होत नसल्याचा आरोप महिला वर्ग, नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. काही ठिकाणी कारवाई झाल्यानंतरही पुन्हा तेच धंदे सुरू होत असल्याचे दिसून येत आहे.दारूबंदी, गुटखा बंदी व अंमली पदार्थांविरोधात शासनाने कडक धोरण जाहीर केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे लक्ष देऊन अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# मानवतेचा एक थेंब द्या, जीव वाचवा !

## एनसीसी विद्यार्थ्यांच्या पोस्टर स्पर्धेतून जनजागृतीचा संदेश

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

मानवतेचा एक थेंब द्या, जीव वाचवा या प्रेरणादायी घोषवाक्याखाली जागतिक रक्तदाता दिन (१४ जून) निमित्त शासकीय जिल्हा रुग्णालय वाशिम येथील जिल्हा रक्त संक्रमण केंद्र व श्री बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्स यांच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात एकूण ४८ एनसीसी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी रक्तदानाबाबत जनजागृती करणारी विविध आकर्षक पोस्टर्स सादर केली. यासोबतच सर्व कॅडेट्सनी रक्तदानाबाबतची विशेष प्रतिज्ञा घेतली. मी आणि माझे कुटुंबीय, मित्र व सहकारी यांना विनाशुल्क रक्तदानासाठी प्रेरित करीन. कुठलाही भेदभाव न करता रक्तदान करीन आणि रक्ताच्या कमतरतेमुळे कोणीही जीव गमावू नये यासाठी प्रयत्नशील राहीन, अशी ही प्रतिज्ञा होती.




कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रक्ताच्या थेंबाची प्रतीकात्मक प्रतिकृती तयार करून रक्तदान हेच श्रेष्ठ दान अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

या उपक्रमाचे मार्गदर्शन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. हरिदास मुंडे तसेच उपजिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांनी केले. डॉ. अविनाश पुरी यांनी रक्तदान कोण करू शकतो, रक्त वाढवण्यासाठी काय आहार घ्यावा, रक्तदानाची वेळ व प्रक्रिया याबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. तर डॉ. हरिदास मुंडे यांनी रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले.यावेळी रक्त जनसंपर्क अधिकारी सचिन दंडे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी संदीप मोरे व सहाय्यक नरेंद्र सांगळे उपस्थित होते. एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेत सेजल सरनाईक हिने प्रथम क्रमांक, अथर्व चांगटे याने द्वितीय क्रमांक तर समीक्षा घुगे हिने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना डॉ. अनिल कावरखे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल (बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्ट), मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, पर्यवेक्षक किशोर राठोड तसेच शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले. एकूणच, ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये रक्तदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारी ठरली असून सामाजिक भान जागवणारा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे.

# एकाच घरातील चार दिवे विझले; तिवळी गावाचे डोळे पाणावले !



## आई-वडीलांसह दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू; आत्महत्या की घातपात

**●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●**

मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचे मृतदेह आढळल्याने संपूर्ण परिसर हादरला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

चार जिवांचा हसता-खेळता संसार, दोन निष्पाप लेकरांचे निरागस हास्य आणि भविष्यातील असंख्य स्वप्नं. मात्र काळाने असा घाला घातला की एका क्षणात सर्व काही संपलं. तिवळी येथील एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस येताच संपूर्ण परिसर हादरला असून, गावातील प्रत्येक डोळा पाणावला आहे.आत्महत्या की घातपात, याबाबतचे गूढ मात्र अद्याप कायम असून शवविच्छेदन अहवालानंतरच सत्य समोर येणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तिवळी येथील संतोष तुकाराम बकाल, त्यांची पत्नी इंद्रायणी बकाल तसेच दोन निष्पाप चिमुकल्या मुलांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, मुलांचे मृतदेह विहिरीत आढळून आले, तर संतोष बकाल यांनी विद्युत टॉवरला गळफास घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र हा प्रकार आत्महत्येचा आहे की घातपाताचा, याचा तपास शिरपूर पोलीस करीत आहेत.दरम्यान, मृत इंद्रायणी बकाल यांचे भाऊ सुधाकर इंगोले यांनी या घटनेत घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. संतोष बकाल यांना त्यांच्या सख्ख्या भावाकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळत होत्या. त्यासंदर्भातील ध्वनिमुद्रण (रेकॉर्डिंग) उपलब्ध असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. याप्रकरणी यापूर्वी अनेक वेळा पोलिसांकडे तक्रारी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. चारही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले असून आत्महत्या की घातपात याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शवविच्छेदन अहवाल व तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक केशव वाघ यांनी दिली.या दुर्दैवी घटनेमुळे तिवळी गावासह संपूर्ण मालेगाव तालुका शोकसागरात बुडाला असून, चार जीवांच्या अकाली अंताने नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आहेत.


सिटी न्यूज सुपरफास्ट
शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४
अन्न व औषध प्रशासनाचा कंपनीशी मेळ, लहान मुलाच्या जीवनाशी खेळ!
अन्न प्रशासन भ्रष्टाचारयुक्त, पदार्थ भेसळयुक्त!
अवैध औषध विक्री प्रकरणी सिटी मेडिकलवर कारवाई

# कारंजा येथे भेसळयुक्त पदार्थाची उपाहारगृह, हॉटेल व डेअरी मध्ये मोठ्या प्रमाणावर विक्री !

***परराज्यातून आलेले करत आहेत भेसळयुक्त पदार्थाची विक्री**
***अधिकारी हप्ते घेऊन गप्प *सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात**

**●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●**

कारंजा शहर व तालुक्यामध्ये उपहारगृह, हॉटेल व डेअरी मध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त पदार्थाची विक्री सुरू असून सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तरीसुद्धा संबंधित अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी हप्ते घेऊन गप्प बसले आहे.

सविस्तर माहिती अशी की महाराष्ट्रात तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासन






विभाग आयुक्त पदाचा पदभार घेतला पासून भेसळयुक्त पदार्थाची विक्री करणाऱ्या उपहारगृह, हॉटेल, डेअरी, मेडिकल व अवैध गुटखा यांच्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी टाकण्यात येते आहे.कारंजा शहरांमध्ये बाहेरच्या राज्यांमधून आलेल्या व्यवसायिकांनी उपाहारगृह व हॉटेल या व्यवसायावर कब्जा केलेला असून खुलेआम भेसळयुक्त पदार्थाची विक्री करत आहे. कारंजा शहरांमध्ये दुधाचा एवढा तुटवडा असताना यांना दुधापासून बनवणारे पदार्थासाठी बाराही महिने एवढ्या मोठ्या प्रमाणात दूध कोठून मिळते हा एक मोठा प्रश्न आहे.या सर्व उपायागृहाच्या व हॉटेलच्या किचनची झडती होणे आवश्यक आहे.याचा तपासणी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली तर नक्कीच मोठा गोप्या स्फोट होईल.पण अधिकारी असे करणार नाही कारण की हप्ते घेऊन गप्प बसले आहे. कारण बऱ्याच वेळा आम्ही तक्रारी केली आहे.पण त्याचा काडी मात्र उपयोग झाला नाही.कारण आम्ही २ वर्षा आधी दोनद बुद्रुक येथील हॉटेलमध्ये डिटर्जंट पावडर पासून खवा बनवण्याचा व्हिडिओ व बातम्या प्रसारित केल्या होत्या पण त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.कारण त्यामध्ये पैशाची देवाणघेवाण झाली होती.त्यामुळे मा.आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्वतः कारंजा शहरांमध्ये कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.तसे निवेदनही त्यांना पाठवण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तेल काढणी युनिट व गोदामासाठी अनुदान

**●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●**

जिल्ह्यातील सोयाबीन व इतर तेलबिया पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत ‘राष्ट्रीय खाद्यतेल अभियान – तेलबिया’ अंतर्गत सन २०२६-२७ मध्ये काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारणीसाठी विशेष अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत १० टन क्षमतेच्या तेल काढणी युनिट तसेच २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

तेलबियांचे सुरक्षित साठवण व बाजारपेठेतील मूल्यवृद्धी लक्षात घेऊन २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी रुपये ११,५२१ प्रति




## १९ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मेट्रिक टन या प्रमाणे एकूण २८ लाख ८० हजार २५० रुपये खर्च निश्चित करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेसाठी शेतकरी उत्पादक संस्था व कंपन्या , सहकारी संस्था, सरकारी किंवा खाजगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था पात्र असून मूल्य साखळी भागीदार गटांना प्राधान्य दिले जाणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. १४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# ग्रा.पं. कर्मचाऱ्यांचे राज्यस्तरीय महाअधिवेशन २० जूनला

**धोत्राभणगोजी :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे भव्य राज्यस्तरीय महाअधिवेशन शनिवार २० जून रोजी दुपारी २ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील आदिती लॉन्स, लाडगाव येथे होणार आहे. युनियनचे संस्थापक अध्यक्ष गिरीश दाभाडकर यांच्या संकल्पनेतून या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच आमदार व महाराष्ट्र राज्य कर्मचारी युनियनचे राज्य अध्यक्ष बच्चूभाऊ कडू उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढ, सेवा शर्ती, पेन्शन योजना, प्रलंबित मागण्या आणि इतर विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या महाअधिवेशनाला कर्मचाऱ्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष विवेकानंद पवळ यांनी केले आहे.

# 268 ब्रास रेतीसाठा जप्त; पाच ठिकाणी छापेमारी !

## महसूल विभागाची शेगाव तालुक्यात कारवाई

प्रतिनिधी १४ जून

**शेगाव:** रेतीचे अवैध उत्खनन आणि साठेबाजीविरोधात शेगाव तहसील प्रशासनाने शनिवारी धडक कारवाई करत, भास्तन शिवारातील विविध ठिकाणी साठवून ठेवलेला सुमारे २६८ ब्रास रेतीसाठा जप्त केला. या कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत. तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकप्रमुख तथा नायब तहसीलदार विजय सुरडकर यांच्या नेतृत्वात महसूल विभागाच्या पथकाने भास्तन शिवारात छापेमारी केली. कारवाईदरम्यान पाच वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रेतीचा साठा आढळून आला. संबंधित ठिकाणांची पाहणी करून पंचनामा करण्यात आला आणि रेतीसाठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेला रेतीसाठा भास्तन गावच्या पोलिस पाटील आणि ग्राम दक्षता समितीच्या ताब्यात देखरेखीसाठी देण्यात आला आहे. या कारवाईत मंडळ अधिकारी पालकर तसेच तलाठी वानखडे, मांटे, ढोकणे आणि संबंधित गावचे पोलिस पाटील सहभागी होते. रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी महसुल प्रशासन 'ॲक्शन मोड'वर असल्याचे सद्यःस्थितीत पाहायला मिळत आहे. रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत.

**शासकीय कामांसाठी रेतीचा वापर होणार!**
शासनाच्या धोरणानुसार जप्त रेतीसाठा शासकीय कामांसाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नायब तहसीलदार विजय सुरडकर यांनी परिसरातील ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी संपर्क साधून घरकुल योजनांसह इतर शासकीय कामांसाठी रेतीची आवश्यकता आहे का, याबाबत विचारणा केली. पंचनाम्यानुसार हा साठा पुढील आदेशापर्यंत पोलिस पाटील व ग्राम दक्षता समिती यांच्या देखरेखीखाली ठेवण्यात येणार आहे.

**रेती माफियांवर कारवाई सुरूच राहणार!**
रेतीसाठ्याची मालकी अद्याप कोणत्याही व्यक्तीने स्वीकारलेली नाही. महसूल विभागाच्या या कारवाईमुळे रेतीची अवैध साठेबाजी व उत्खनन करणाऱ्यांना स्पष्ट इशारा मिळाला असून, अशा कारवाया पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहतील, असे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. तालुक्यातील नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठी उचललेल्या या पावलाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. दरम्यान, रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# गुटखा, मावा व किराणा दुकानदार विक्रेत्यांचे धाबे दणाणले

प्रतिनिधी १४ जून

**देऊळगावराजा:** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभर बेकायदेशीर घुटखा, मावा, सुगंधित तंबाखू, नशिले पदार्थ तसेच अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे संकेत दिल्याच्या चर्चेने देऊळगाव राजा शहरातील व्यापारी व विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या चर्चेचा परिणाम म्हणून शहरातील अनेक पानटपऱ्या, किरकोळ विक्रेते आणि काही खाद्यपदार्थ विक्रेत्यांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

मिळालेल्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनाचे पथक अचानक तपासणीसाठी दाखल होणार असल्याची चर्चा शहरात पसरल्यानंतर अनेक ठिकाणी घाईगडबडीने मालाची आवराआवर करण्यात आल्याचे सांगितले जाते. विशेषतः गुटखा, मावा, सुगंधित तंबाखू, ई-सिगारेटसदृश उत्पादने तसेच नियमबाह्य पद्धतीने विक्री होणाऱ्या वस्तूंवर कारवाई होणार असल्याची चर्चा दिवसभर रंगली.

याशिवाय उघडे खाद्यपदार्थ, मोकळ्या तेलाची विक्री, विनापरवाना खाद्यपदार्थ व्यवसाय, दुग्धजन्य पदार्थांची वापरणाऱ्या विक्री आणि प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य व्यावसायिकांमध्येही अस्वस्थता निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, संबंधित कारवाईबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी केवळ चर्चेनेच अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'नियमांचे पालन होत असेल तर कारवाईची भीती कशाला?' असा प्रश्नही नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. एकूणच, तुकाराम मुंडे यांच्या संभाव्य धडक मोहिमेच्या चर्चेने देऊळगाव राजा शहरात दिवसभर खळबळ उडाली असून, घुटखा-मावा व नशिले पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणल्याची चर्चा सर्वत्र रंगत आहे.

# हातभट्टी दारू निर्मितीवर छापा

प्रतिनिधी १४ जून

**नांदुरा:** नांदुरा पोलीस ठाण्याच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ग्राम अवधा शेतशिवारात छापा टाकून अवैधरित्या हातभट्टी दारू निर्मिती करणाऱ्या एका आरोपीविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारा सुमारे ५ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश बळीराम जमेवार वय ३३, रा. खोलखेड हा अवधा शिवारात असलेल्या आपल्या शेतामध्ये अवैधरित्या हातभट्टी दारू तयार करत असल्याची गुप्त माहिती ठाणेदार जयवंत सातव यांना मिळाली होती. या माहितीनंतर नांदुरा पोलिसांनी त्या ठिकाणी ११ जून रोजी दुपारी छापा टाकला. या कारवाईदरम्यान २० लिटर गुळमिश्रित मोह सडवा, १५ लिटर हातभट्टी दारू, १५ लिटर उकळता मोह सडवा, प्लास्टिक नळ्या तसेच दारू गाळण्याचे साहित्य असा एकूण ५,३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पो कॉ. गणेश नागरे यांच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिसांनी आरोपी प्रकाश बळीराम जमेवार याच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कलम ६५ (क), (फ) व (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला नोटीस देऊन सोडण्यात आले असून पुढील तपास सहाय्यक फौजदार गजानन इंगळे करीत आहेत.

# १७ जून रोजी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीदिनानिमित्त खामगाव शहरात अभिवादन

## सकल राजपुत समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे - माजी आमदार राणा दिलीपसिंह सानंदा

प्रतिनिधी १४ जून





**खामगांव:** दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी तिथीनुसार ज्येष्ठ शुक्ल तृतीया म्हणजे बुधवार दि.१७ जून २०२६ रोजी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांच्या ४८६ वी जयंती असुन महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांवच्या वतीने ०७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता महात्मा गांधी भवन, गांधी चौक खामगाव येथे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली सकल राजपुत समाजाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीला सकल राजपुत समाज बांधवांसह राजपुत संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिह यांची जयंती निमित्त अभिवादन, रक्तदानासह विविध विधायक कार्यक्रमांनी साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खामगाव शहरात महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त आयोजित विविध विधायक कार्यक्रमांना खामगाव विधानसभा मतदार संघासह बुलढाणा जिल्हयातील सकल राजपुत समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे माजी आमदार राणा दिलीपसिंह सानंदा व महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांव यांच्या वतीने करण्यात आले आहे. महाराणा प्रताप जयंतीदिनिमित्त बुधवार दि.१७ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता समाजभुषण, शक्तीउपासक राणा गोकुलसिंहजी सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली व राजपुत समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नांदुरा रोडवरील भारतरत्न राजीव गांधी उद्यानात हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंहजी यांच्या पुतळयाचे पुजन करुन माल्यार्पण व अभिवादन व ध्वजवंदन कार्यक्रम संपन्न होणार आहे. तद्नंतर खामगाव सामान्य रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न होणार आहे तसेच सकाळी १०.३० वाजता सामान्य रुग्णालय येथे रुग्णांना फळ व बिस्कीटांचे वाटप करण्यात येणार आहे.सकाळी ११ वाजता २० लक्ष रुपये खर्चुन प्रभाग क्रं.३ मधील हिंदुसुर्य महाराणा प्रताप भवन येथे कॅम्पाऊंड वॉल बांधकामासह इतर अनुषंगिक विकास काम करणे तसेच प्रभाग क्रं.७ मधील चांदमारी चौक येथे २२ लक्ष रुपये खर्च करुन संत रोहिदास महाराज व्यासपीठाचे बांधकामासह इतर अनुषंगिक विकास कामे करणे यासह इतर विविध विकास कामांचे भुमीपुजन पार पडणार आहे.दुपारी १ वाजता लॉयन्स संस्कृती अन्नछत्र येथे सामान्य रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन वाटप करण्यात येणार आहे.

सायंकाळी ५ वाजता महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त राणा व्यायाम मंदिर दालफैल येथुन हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात येणार असून या शोभायात्रेचा स्व.राजीव गांधी उद्यान, नांदुरा रोड येथे समोराप होणार आहे.तसेच सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत स्व.राजीव गांधी उद्यान येथे हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त पुतळा परिसरामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती व १० वी व १२ वी मधील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार व फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात येणार आहे. अश्या विविध विधायक कार्यक्रमांनी हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी होणार असुन या सर्व कार्यक्रमांना खामगाव विधानसभा मतदार संघासह बुलढाणा जिल्हयातील सकल राजपुत समाज बांधवांनी आपल्या परिवारासह डोक्यावर केसरी फेटा बांधुन महाराणाजींचा जय-जयकार करीत हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे माजी आमदार राणा दिलीपसिंह सानंदा व महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती खामगांवसह विविध राजपुत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# कत्तलीसाठी बैलांची वाहतूक; दोघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १४ जून

**शेगाव:** बैलांना दाटीवाटीने व निर्दयतेने वाहनातून कत्तलीसाठी नेत असल्याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या पोहेकॉ योगेश सोपान चोपडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात माहितीनुसार, आला. ११ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:५४ वाजताच्या सुमारास शिवाजी चौक, शेगाव येथे आरोपी शेख सलीम शेख अजिज (वय ४०) व शेख अफसर शेख अक्तर (वय ३१, दोघेही रा. बावणबीर, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा) हे टार्टर्फ मालवाहू वाहन (क्र. श्प्‌ ४७ ०१०२) मधून दोन बैलांची वाहतूक करताना आढळून आले. तपासादरम्यान आरोपींनी प्रत्येकी सुमारे ४० हजार रुपये किंमतीचे असे एकूण ८० हजार रुपये किंमतीचे दोन बैल वाहनात दाटीवाटीने, आखूड दोरीने बांधून ठेवले होते. तसेच जनावरांसाठी चारा पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यांना निर्दयतेने कत्तलीसाठी नेले जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी शेगाव शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाच्या कलम ५ (अ), ५ (ब), ९ तसेच प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या कलम ११(१)(घ), (ङ), (च) अन्वये गुन्हा क्रमांक ३६८/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

# शेतीचा रब्बी उन्हाळी टक्का घसरला कृषि अहवाल, शेतकऱ्यांची विदारक स्थिती

प्रतिनिधी १४ जून

**सोनाळा :** 'शेकडो वेळा चंद्र आला. तारे फुलले मात्र शेतीत भाकरीचा चंद्र शोधण्यास अख्खी जिंदगी बरबाद झाली'. अशी भयावह आर्थिक स्थिती रब्बी अन् उन्हाळी पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची झाली आहे. यंदाचा तीव्र उन्ह झळा झेलत शेतकरी निसर्ग चक्रासमोर हतबल झाला आहे. चोहोबाजूंनी शेतकऱ्यांची कोंडी सुरु आहे . परिणामी कांदा, ज्वारी भूईमुंग भाजीपाला व इतर पिकाच्या उत्पन्नात आलेली प्रचंड घट अन पडलेले दर याचा थेट परिणाम उन्हाळी पिकांवर पडला आहे. संग्रामपूर तालुक्याचे शेतीचे वहितीखाली क्षेत्र ४३८९१ हेक्टर असतांना केवळ ३१८३ हेक्टर वर उन्हाळी पिके घेण्यात आली रब्बी उन्हाळी पिकाचा हा टक्का घसरला असून केवळ ७ टक्के क्षेत्रावर सिंचन झाले. आता पर्यंतचा उन्हाळी पिकांचा हा निच्चांकी दर आहे. येथील शेती मातीची ही स्थिती मन सुन्न करणारी आहे. तालुक्यात संग्रामपूर, पातुर्डा, कवठळ, बावनबीर, सोनाळा हे ५ महसुल मंडळ आहेत. कृषी विभागचे पिक पेरणी अहवालानुसार उन्हाळी ज्वारी ४९४ हेक्टर, मका ७७२ हे., उन्हाळी मुंग ७१ हेक्टर, भुईमुंग ४०५, तीळ २९५ हेक्टर, तरबुज खरबूज ६६ हेक्टर, उन्हाळी कांदा ७८४ हेक्टर वर घेण्यात आला.

येथे भाजीपाला क्षेत्र घटले आहे. २९६ हेक्टर भाजीपाला पिक घेण्यात आले. एकूण हे ३१८३ हेक्टर क्षेत्र होते. एकंदर शेत जमिनीच्या तुलनेत याची टक्केवारी ७. १४ एवढी कमी आहे. या वर्षी कांदा तरबुज खरबूज मका ज्वारी आदि चे भाव खुल्या बाजारात गडगडले. कांदा अवध्या ५ ते ६ रुपये दराने विक्री करावी लागली. लागत खर्च सुद्धा निघला नाही. ज्वारी खुल्या बाजारात २२०० रुपये प्रति क्विंटल दराने विकावे लागली आहे. यात शेतकरी पार डूबला आहे . संग्रामपूर तालुक्यात सिंचनाचा टक्का वाढावा यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. तीन सिंचन धरण चोंढी, अर कचेरी, आलेवाडी हे उभारण्यात आले आहेत. तरी ही येथे उन्हाळी पिके घेण्यात वाढ होत नसल्याचे समोर आले आहे.

# मतदान केंद्रासाठी बीएलए नियुक्त करा

## मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचे राजकीय पक्षांना आवाहन

प्रतिनिधी १४ जून

**मेहकर :** भारत निवडणूक व तथा आयोगाच्या निर्देशानुसार सुरू होणाऱ्या मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण रक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीची शुद्धता, अचूकता व पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय राज्यस्तरीय राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रासाठी बूथ लेव्हल एजंट (बीएलए) नियुक्त करावेत, असे आवाहन मेहकर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी केले आहे. मेहकर मतदार संघामध्ये एकूण ३५० मतदान केंद्र असून त्यापैकी २४३ मतदान केंद्र मेहकर तालुक्यामध्ये तर १०७ मतदान केंद्र लोणार तालुक्यामध्ये समाविष्ट आहे दोन्ही तालुक्यात मिळून मतदारसंघाची मतदार संख्या जवळपास ३०२००० इतकी आहे. त्यामुळे मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत निवडणूक आयोगाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी २९

जून पासून २९ जुलै पर्यंत प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन प्रत्येक मतदाराचा ENUMERATION अर्ज मतदाराला देणार आहेत. त्या मतदाराने तो संबंधित पूर्ण अर्ज भरूनत्यावर स्वाक्षरी करून आणि एक पासपोर्ट फोटो त्यावर चिटकवल्यानंतर असा अर्ज परत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे जमा करायचा आहे. या मतदाराचा असा अर्ज बीएलओ यांच्याकडे पुन्हा प्राप्त होणार नाही अशा मतदारांची नावे मतदार यादी मधून कमी होणार आहेत

या कार्यक्रमांतर्गत मतदार यादीतील नवीन मतदारांची नोंदणी, स्थलांतरित अथवा मृत मतदारांची माहिती, नावातील दुरुस्ती तसेच इतर आवश्यक बदलांच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांचे बूथ लेव्हल एजंटची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. बीएलए हे संबंधित राजकीय पक्ष आणि निवडणूक प्रशासन बीएलओ यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करतात. त्यांच्या सहभागामुळे मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत ठेवण्यास मदत होते. तसेच अनावश्यक चुकीच्या मतदारांची नोंदणी टाळल्या जाऊ शकते. तसेच कोणत्याही मतदाराचे नाव चुकीने कमी होऊ नये याची सुद्धा बीएलए यांची मदत प्रशासनाला होऊ शकते.

# पाणी टंचाईविरोधात नागरिक आक्रमक; १६ जूनला जनआंदोलन

प्रतिनिधी १४ जून



**मलकापूर :** मलकापूर शहरातील भीषण पाणी टंचाईबाबत १२ जून रोजी चांडक विद्यालय येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शहरातील बहुसंख्य नागरिकांनी नगर परिषदेच्या अनागोंदी कारभारा विरुध्द तीव्र आक्षेप नोंदवित लवकरच पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत जनआंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मलकापूर नगर परिषद मार्फत धुपेश्वर येथून पुर्णा नदी पात्रातून शहराला पाणी पुरवठा करण्यात येतो. मात्र गेल्या काही महिन्यांपासून विशेषतः मार्च, एप्रिल व मे या कालावधीमध्ये शहर वासियांना १५ ते २० दिवसानंतर पाणी पुरवठा करण्यात येत आहे. म्हणजेच महिन्यातून फक्त २ वेळा शहर वासियांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या विरूध्द नगर पालिकेतील सत्ताधारी सोडून कोणत्याही नगर सेवकांनी व गटनेत्यांनी या शहराच्या भीषण पाणी टंचाईबाबत फक्त सभागृहामध्ये मेमो देण्या व्यतीरिक्त कुठलीही ठोस अशी भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे मलकापूर शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते ओम शिंदे यांनी या विरूध्द जनआंदोलन छेडण्याचा इशारा देवून १२ जून रोजी चांडक विद्यालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर या बैठकीमध्ये १६ जून रोजी नगर पालिका प्रशासना विरूध्द जनआंदोलन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यामुळे मलकापूर शहरातील सर्वसामान्यांसह अनेकांनी याला पाठींबा दर्शवित आंदोलनामध्ये सहभागी होण्याची संमती दर्शविली.

# एल-निनोच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब करा!

## तालुका कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

प्रतिनिधी १४ जून

**खामगाव:** खामगाव यंदा 'एल-निनो'च्या प्रभावामुळे मान्सून उशिरा दाखल होण्याची, पावसाचे प्रमाण कमी राहण्याची तसेच पावसाचे असमान वितरण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर खरीप हंगामावरील संभाव्य परिणाम कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विविध अनुकूलात्मक उपाययोजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना उशिरा पेरणीसाठी योग्य नियोजन करण्यासह कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या आणि कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे. तसेच हवामान बदलाशी सुसंगत आणि दुष्काळ सहनशील वाणांच्या प्रसारावर विशेष भर देण्यात येत आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी बीबीएफ तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येणार असून, सुमारे ३० टक्के शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. उंच वरंबा-खोल सरी पद्धतीमुळे मातीतील आर्द्रता संतुलित राहण्यास मदत होते. तसेच पिकांच्या मुळांची वाढ चांगली होऊन खतांचा अपव्यय टाळला जातो.

**कृषी विभागाने शेतकऱ्यांना उशिरा पेरणीसाठी योग्य नियोजन**
करण्यासह कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या आणि कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे. तसेच हवामान बदलाशी सुसंगत आणि दुष्काळ सहनशील वाणांच्या प्रसारावर विशेष भर देण्यात येत आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी बीबीएफ तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येणार असून, सुमारे ३० टक्के शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. उंच वरंबा-खोल सरी पद्धतीमुळे मातीतील आर्द्रता संतुलित राहण्यास मदत होते. तसेच पिकांच्या मुळांची वाढ चांगली होऊन खतांचा अपव्यय टाळला जातो.

**सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अवलंब करा !**
याशिवाय, ठिबक व स्प्रिंकलर सिंचन, मल्चिंग आणि अन्य सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे ३० ते ५० टक्क्यांपर्यंत पाण्याची बचत होण्यास मदत होते, तसेच उत्पादनवाढीसही चालना मिळते. माती परीक्षणावर आधारित खतांचा वापर, सेंद्रिय व जैविक खतांना प्रोत्साहन आणि मृदा आरोग्य संवर्धनावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

दुष्काळ सहनशील वाणांच्या प्रसारावर विशेष भर देण्यात येत आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी बीबीएफ तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यात येणार असून, सुमारे ३० टक्के शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. उंच वरंबा-खोल सरी पद्धतीमुळे मातीतील आर्द्रता संतुलित राहण्यास मदत होते. तसेच पिकांच्या मुळांची वाढ चांगली होऊन खतांचा अपव्यय टाळला जातो.

**'एल-निनो' म्हणजे काय? परिणाम काय ?**
'एल-निनो' ही प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठाच्या तापमानातील असामान्य वाढीशी संबंधित हवामान प्रक्रिया आहे. याचा परिणाम जगभरातील हवामान चक्रावर होत असून भारतातील मान्सूनवरही त्याचा प्रभाव पडू शकतो.

**पीक नियोजन करा!'**
हवामान बदलाशी सुसंगत वाणांचा अवलंब केल्यास कमी पावसाच्या परिस्थितीतही उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. तसेच उशिरा पेरणीसाठी पर्यायी पीक नियोजनाचा अवलंब करणेही आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. १४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# कॉंग्रेस का 'हात' अब 'कमल' के साथ

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** अकोला महानगरपालिका आणि स्थानिक राजकारणातून अत्यंत खळबळजनक आणि धक्कादायक वृत्त समोर येत आहे. काँग्रेसचे आमदार साजीद खान पान यांच्या पायाखालची वाळू सरकली असून, त्यांच्याच पक्षाचे तब्बल १४ नगरसेवक त्यांना एकाच वेळी मोठा राजकीय झटका देण्याच्या तयारीत आहेत. महानगरपालिकेतील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने काँग्रेसला खिंडार पाडण्यासाठी कंबर कसली असून, पडद्यामागून सुरू असलेल्या या मो'या गेम प्लॅनमुळे अकोला काँग्रेसमध्ये प्रचंड खळबळ माजली आहे. आमदार साजीद खान प'ाण यांच्या घरातच

**अकोला राजकारणात महाभूकंप !**
**आमदार साजीद खान पठाण यांना झटका बसणार**
**काँग्रेसला खिंडार पडण्याची भिती**



लागलेली ही आग विझवण्यात ते अपयशी 'रल्यास, अकोल्यातून काँग्रेसचा पूर्ण सफाया होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. भाजपच्या या 'ऑपरेशन कमळ' सदृश खेळीमुळे अकोल्याच्या राजकारणाला कोणती नवीन कलाटणी मिळते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### आमदारांचे नियंत्रण सुटले, काँग्रेसमध्ये उभी फूट!

◆ अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजीद खान प'ाण यांचे आपल्याच पक्षाच्या नगरसेवकांवर अजिबात नियंत्रण राहिले नसल्याचे उघड झाले आहे. आमदारांच्या कार्यपद्धतीला कंटाळून आणि अंतर्गत गटबाजीला विटून तब्बल १४ नगरसेवक बंडाच्या पवित्र्यात आहेत. हा गट थेट वेगळा गट स्थापन करण्याच्या तयारीत आहे. महानगरपालिकेत पूर्ण वर्चस्व राखण्यासाठी भाजपला नेमका हाच १४ नगरसेवकांचा स्वतंत्र गट हवा आहे. काँग्रेसला अकोल्यात भुईसपाट करण्यासा'ी भाजपने आपली संपूर्ण शक्ती पणाला लावली असून, बंडखोर नगरसेवकांसाठी पायघड्या अंथरल्या आहेत.

### डीपीसी निधीचे कोट्यवधींचे 'मॅटर' चव्हाट्यावर !

या संपूर्ण बंडाच्या केंद्रस्थानी आहे जिल्हा नियोजन समितीचा कोट्यवधी रुपयांचा विकास निधी आहे. याच कोट्यवधींच्या निधीचे मॅटर आता चव्हाट्यावर आले असून नगरसेवकांमध्ये तीव्र असंतोष आहे. हा कोट्यावधीचा निधी मिळविण्यासा'ी काँग्रेसचे नगरसेवक थेट भाजप च्या दावणीला बांधले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकीकडे अनेकांवर 'जात पडताळणी'ची टांगती तलवार आहे, तर दुसरीकडे आगामी निवडणुका जिंकण्यासाठी आपापल्या प्रभागात विकासकामांचा धडाका लावणे अत्यंत गरजेचे आहे. निधी मिळाला नाही तर प्रभाग हातून जाईल, याच भीतीपोटी आणि विकासाच्या गरजेपोटी नगरसेवकांनी थेट भाजपशी हातमिळवणी करण्याचा मार्ग निवडल्याची चर्चा आहे.

# आता खतासाठी लागणार नाही सातबारा, आधारकार्ड!

**जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश : शेतकरी वर्गाला मिळाला दिलासा**

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** अकोल्यात युरिया खरेदीसाठी सातबारा उतारा आणि आधार कार्ड यांसारखे ओळखीचे पुरावे आता अनिवार्य नसणार आहेत. कृषी केंद्रांबाहेर शेतकऱ्यांच्या लागलेल्या मोठ्या रांगांनंतर प्रशासनाने तातडीने १३ जून रोजी नवी आदेश काढत आता खतासाठी ओळखीचा पुरावा म्हणून लागणारे आधार कार्ड, सातबारा उतारा लागणार नसल्याचे त्यात नमूद केले आहे.

युरिया खरेदीतील गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी खत खरेदीसाठी सातबारा अनिवार्य केला होता. मात्र, तरीही कृषी केंद्रांबाहेर रात्री तीन वाजल्यापासून शेतकऱ्यांच्या रांगा कायम होत्या. तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशामुळे भाडेतत्त्वावर (बटाईने) शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसह इतरही अनेक शेतकऱ्यांना सातबारावर युरिया खरेदी करताना मोठ्या अडचणी येत होत्या. अखेर कृषी मंत्र्यांनी याची दखल घेत खत खरेदीसाठी सातबारा मागणाऱ्यांवर

### शेतकऱ्यांना एक ते पाच पोतेच युरिया, डीएपी!

शेतकऱ्यांना प्रतिएकरी मर्यादित खत वाटप करण्यात येणार असून, एका शेतकऱ्याला त्याच्या गरजेनुसार पेरणीपुरते किमान १ पोते आणि जास्तीत जास्त ५ पोते युरिया व डी.ए.पी. खताचे वाटप केले जाईल. कोणत्याही व्यक्तीला ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त खताचा साठा दिला जाणार नाही. खतांचा तुटवडा रोखण्यासाठी आणि गरजू शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळवून देण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन करून खतांचा काळाबाजार किंवा साठेबाजी केल्यास संबंधित कृषी सेवा केंद्रावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही आदेशातून जिल्हाधिकारी यांनी दिला आहे.

कठोर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना दिल्या. त्यानंतर अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी १३ जून रोजी खत खरेदीसाठी लागू केलेल्या जाचक अटी रद्द करत नवीन आदेश जारी केले. आता शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी सातबारा अनिवार्य नसणार आहे. मात्र, या नवीन आदेशानंतर पुन्हा एकदा कृषी सेवा केंद्रांसमोर युरिया आणि डीएपीसाठी शेतकऱ्यांच्या मोठ्या रांगा लागण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत बळीराजा खत खरेदी संदर्भात आज मोठ्या संभ्रमात पडला आहे. युरिया खरेदीतील गैरप्रकार रोखण्यासाठी अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आधी युरिया खरेदीसाठी सातबारा उतारा आणि आधार कार्ड बंधनकारक केले होते. युरिया आणि डीएपी खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना सातबारा, आधार कार्ड सोबतच 'थंब किंवा ओटीपी' देणे बंधनकारक असल्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी पत्राद्वारे दिले होते. मात्र, यामुळे प्रत्यक्ष शेती कसणारे (भाडेतत्त्वावरील) शेतकरी आणि ज्यांची शेती आजारी वडिलांच्या नावे आहे अशा त्यांच्या पाल्यांना युरिया खरेदी करताना मोठी अडचण येत होती, अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून उमटत होत्या. अखेर प्रशासनाला हा निर्णय मागे घ्यावा लागला.

# अमरावती जिल्ह्यातील ३३ हजार लाडक्या बहिणी कायमच्या अपात्र! नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांकडून लवकरच वसुली

प्रतिनिधी १४ जून

**अमरावती :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेबाबत अमरावती जिल्ह्यातून एक अत्यंत मोठी बातमी समोर येत आहे. या जिल्ह्यातील तब्बल ३३ हजार ३०४ महिला लाभार्थी या योजनेसाठी कायमच्या अपात्र ठरल्या आहेत. प्रशासनाने तब्बल ८ ते १० महिने राबवलेल्या ई-केवायसी मोहिमेनंतर ही धक्कादायक माहिती उघड झाली आहे. यामध्ये अनेक गैरप्रकार चव्हाट्यावर आले असून, चक्क काही पुरुषांनीही महिलांचं नाव दाखवून या योजनेचा नियमबाह्य लाभ घेतला आहे. याशिवाय चुकीची ई-केवायसी, उत्पन्नाचे खोटे



दाखले, आयकर भरणं आणि चारचाकी वाहन असणं अशा विविध कारणांमुळे या महिला अपात्र ठरल्या आहेत. विशेष म्हणजे, या अपात्र लाभार्थ्यांनी तब्बल १५ ते २० महिने शासनाची दिशाभूल करून पैसे लाटले आहेत. आता अशा सर्व बोगस आणि नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांकडून शासन पूर्ण रक्कम वसूल करणार आहे, त्यामुळे नियमबाह्य लाभ घेणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दोन वर्षांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली होती. तेव्हा या योजनेअंतर्गत सरसकट महिलांचे अर्ज स्वीकारण्यात आले होते. त्यानंतर लगेचच अर्ज मंजूर करून दर महिना १५०० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत होते. मात्र या योजनेचा गैरफायदा असंख्य महिलांकडून होत असल्याचं निदर्शनास येताच सरकारने ई-केवायसी आणि अर्जांची पडताळणी सुरू केली. आतापर्यंत या योजनेतील लाखो लाभार्थी महिलांना अपात्र म्हणून वगळण्यात आलं आहे. त्यापैकी अमरावती जिल्ह्यातील ३३ हजार महिला कायमच्या अपात्र ठरल्या आहेत.

# स्वनाथ बालकांच्या मानसिक विकासासाठी मामाच्या गावाला जाऊ या संकल्पना

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** महानगरातील विविध अनाथ व निराधार गृहात राहणाऱ्या व त्याचप्रमाणे आई-वडिलांचे छत्र हरवून आपल्या नातलगांकडे राहत असणाऱ्या स्वनाथ बालकांसाठी विश्व मांगल्य स्वनाथ परिषद च्या माध्यमातून सुरू असलेल्या 'मामाच्या गावाला जाऊ या' या उपक्रमास उस्फूर्त प्रतिसाद मिळत असून बालकांवर विविध संस्काराचे रोपण करण्यात येत असल्याची माहिती विश्व मांगल्य स्वनाथ परिषदेच्या वतीने मनूताई कन्या शाळेत शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत प्रशांत हरताळकर, विश्व मांगल्य सभेच्या डॉ वृषाली जोशी, पल्लवी कुलकर्णी, कार्यक्रम संयोजिका आरती लड्ढा, सोनिया तराळकर यांनी दिली.



शिक्षण ,आरोग्य, संस्कार, सुरक्षा व स्वयंरोजगार या पाच सूत्रावर अनाथ व निराधार बालकांच्या पुनर्वसनासाठी विश्व मांगल्य स्वनाथ परिषद सेवा कार्य करीत आहे. समाजाच्या मातृशक्तींनी अशी निराधार व अनाथ बालक बालिका एका वर्षासाठी दत्तक घेऊन त्यांच्यावर सुयोग्य शिक्षणाचे संस्काराचे रोपण करून त्यांना आईची माया व प्रेम दिले आहे. अशा या उपक्रमाचे हे तिसरे वर्ष असून त्याच अनुषंगाने अशा बालकांच्या सर्वंकष विकास व संस्कारासाठी 'मामाच्या गावाला जाऊ या' हा उपक्रम साकार करण्यात आला असून या उपक्रमात स्वनाथ असलेल्या ६० बालक, बालिकांनी सहभाग नोंदविला असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यासाठी बालकांचे तीन दिवसीय सामूहिक शिबिर मनुताई कन्या शाळेत सुरू असून त्याला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दि १२ जून रोजी या शिबिराचा प्रारंभ गुजरात गांधीनगर येथील बाल अनुसंधान विद्यापीठचे कुलपती टी एस जोशी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी झालेले साठ बालक बालिका आपल्या वार्षिक दत्तक माता समवेत विविध मानसिक शारीरिक ,बौद्धिक गुण व कला आत्मसात करीत आहेत. अधिक मासात साकार केलेल्या या उपक्रमास मातृशक्तींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत निराधार व अनाथ बालकांना दत्तक घेऊन आपले सामाजिक दायित्व जोपासले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या तीन दिवसीय शिबिरात बालकांसाठी अनेक करमणुकीचे कार्यक्रम हाती घेण्यात आले असून त्यात योग व झुंबा, विविध प्रकारच्या क्रीडा व खेळ, आर्ट व क्राफ्ट, संस्कार, कथाकथन, वकृत्व ,आरोग्य तपासणी व संपूर्ण मार्गदर्शन देण्यात येत असून ज्याप्रमाणे बालक बालिका आपल्या मामाच्या गावाला जातात व सुट्ट्यांचा आनंद घेतात, तशाच पद्धतीचा अविष्कार या उपक्रमाच्या माध्यमातून बालकांना देण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या शिबिराचा समारोप रविवार दिनांक १४ जून रोजी होणार असून या समारोपीय सोहळ्यात मातृशक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या तीन दिवशी उपक्रमास विश्व मांगल्य स्वनाथ परिषदेच्या निशा टावरी, कल्पना भुतडा, सोनल रायपुरे, माणिक नेरकर, कविता माल्, भाग्यश्री साबळे, पुष्पा वानखडे, अश्विनी जकाते, पल्लवी रावणकर, शोभा गोयनका, सोनल ठक्कर, गीरीजा जागीरदार, संतोष कुलकर्णी, चंदू लड्ढा आदी सेवा देत असल्याचे यावेळीं सांगण्यात आले.या पत्रकार परिषदेत यावेळी विश्व मांगल्य स्वनाथ परिषद च्या महिला व बालके उपस्थित होते.

# 25 फुट खोल धरणातील युवकाचा मृतदेह मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनच्या जवानांनी बाहेर काढला

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाऊंडेशनच्या संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध व बचाव पथक पिंजरने २५ फूट खोल धरणातील युवकाचा मृतदेह बाहेर काढला.

वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील फुलऊमरी येथील धरणात पुसद येथील रहीवासी अंश विजय जयस्वाल १८ हा आपल्या चार मित्रांसोबत शनिवारी सकाळी ८:०० वाजता पोहण्यासाठी आला होता. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने अंश धरणात बुडाल्याची माहिती मानोरा तहसीलदार राजेंद्र पाटील यांनी पिंजर येथील संत गाडगे बाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख जीवन-रक्षक दीपक सदाफळे यांना दिली. दीपक सदाफळे



आणि त्यांचे सहकारी मयुर सळेदार, अतुल उमाळे, गोपाल गीरे, ऋतीक वाघ, मोहित सोनवणे यांचेसह शोध व बचाव साहित्यासह घटनास्थळावर दाखल झाले. घटनास्थळ ट्रेसींग केले असता धरणात २५ ते ३५ फुट खोल पाणी आणि तळाशी वाळलेली झाडे आणी मोठ्या प्रमाणात गाळ असल्याचे निदर्शनास आले. पथकाच्या जवानांनी सर्च ऑपरेशन चालु केले. अथक प्रयत्नांनंतर दुपारी तळाशी गाळात फसलेला अंशचा मृतदेह दीपक सदाफळे यांना टच झाला लगेच शोधुन वर आणला. यावेळेस घटनास्थळावर राजेंद्र पाटील, मानोरा पोलीस ठाण्याच्या पीआय नयना पोहेकर, पीएसआय अभिजित बारे, पोलिस कर्मचारी तसचे पुसदचे नायब तहसीलदार सुहास पांडे, सर मंगरूळपीर तहसीलचे ईश्वर चव्हाण, आर. बी.राठोड, सचिन भानावत, अनिल राठोड हजर होते. अशी माहिती शाहु भगत यांनी दिली आहे.

# १२५ वेळा रक्तदान करणारे दीपक मायी

**तीन महिन्यातून एकदा रक्तदान करायचे**

प्रतिनिधी १४ जून

**अकोला :** समाजासाठी आपण काय करू शकतो या भावनेतून वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आणि रक्तदान करू लागलो. रक्तदान दिनानिमित्त डॉ. हेडगेवार रक्तपेढी आणि अकोला अर्बन बँकेचे संचालक दीपक मायी म्हणाले आतापर्यंत १२५ वेळा रक्तदान केले.



आपण मध्यमवर्गीय परंतु समाजाची सेवा कशा प्रकारे करता येईल हा विचार बळावला. आणि १९८५ पासून रक्तदान करू लागलो. दर तीन महिन्यात एकदा रक्तदान केले. २००३ साली डॉ. हेडगेवार रक्तपेढी अकोला येथे स्थापन झाली. आणि रक्तदान मोहिमेला गती मिळाली. रक्तपेढी मध्ये प्लेटलेट्स युनिट असल्याने या भागातील रूग्णांची सोय झाली. थॅलेसेमिया रूग्णांना या माध्यमातून सेवा उपलब्ध झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे झाली. हे औचित्य साधून अकोला शहरासह जिल्ह्यात रक्तदान शिबिरे घेण्यात आली. एक शिबीर देवरावबाबा चाळ परिसरात घेतले असे दीपक मायी म्हणाले. रक्तदानातून गरजेचे प्राण वाचवू शकतो. तसेच रक्त दिल्यावर ४८ तासात रक्त तयार होऊ लागते. त्यामुळे रक्तदानाची भीती बाळगू नका. विशेषतः युवकांनी रक्तदानासाठी पुढे यावे आणि सामाजिक दायित्व पार पाडावे असे आवाहन देखील दीपक मायी यांनी या निमित्ताने केले.

# अकोला जिल्ह्यात मुबलक युरिया खत उपलब्ध

**अकोला :** जिल्ह्यात एप्रिल ते जून दरम्यान युरिया खत मंजूर आवंटन १४१२२ मे टन असून आत्तापर्यंत १२६७२ मे टन म्हणजेच ९०३ युरिया खत पुरवठा झाला आहे. तसेच आज रोजी नर्मदा बायोकेम या कंपनीची १३०० मे टन युरिया खताची रेक जिल्ह्यात दाखल झाली असून त्याचे ही वाटप सुरू आहे. गुरुवार दिनांक १७ जून २०२६ पर्यंत आयपीएल कंपनीची १२०० मे टन व चंबल कंपनीची ९०० मे टन असे एकूण २१०० मे टन युरिया खत उपलब्ध होणार आहे. आज रोजी जिल्ह्यात ४८६२ मे टन युरिया खत उपलब्ध आहे. सर्व शेतकऱ्यांना त्याचे वाटप सुरळीतपणे सुरू आहे.

मुबलक प्रमाणात खत उपलब्ध असून भविष्यातही खत निरंतर पणे उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवाना बळी न पडता प्रशासनास सहकार्य करावे.

गर्दी तसेच जास्तीची खत खरेदी करणे टाळावे असे आवाहन कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले आहे.

# फुलउमरी तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी १४ जून

**◆ मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला होता; शहरात हळहळ**

**यवतमाळ :** मित्रांसोबत पोहण्यासाठी गेलेल्या पुसद येथील एका तरुणाचा मानोरा तालुक्यातील फुलउमरी येथील तलावात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी घडली. अंश जयस्वाल (वय अंदाजे १७ ते १८) असे मृत तरुणाचे नाव असून, तो पुसद शहरातील माहूर टी-पॉइंट परिसरातील अतिथी हॉटेलचे मालक जयस्वाल यांचा मुलगा होता. मिळालेल्या माहितीनुसार, अंश हा काही मित्रांसह फुलउमरी येथील तलावात पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना तो तलावाच्या खोल पाण्यात गेला. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडू लागला. त्याच्या मित्रांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला;



मात्र त्यांना यश आले नाही. घटनेची माहिती मिळताच मानोरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

स्थानिक नागरिकांच्या मदतीने तलावात शोधमोहीम राबविण्यात आली. अनेक तासांच्या प्रयत्नांनंतर अंशचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास मानोरा येथे मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेमुळे पुसद शहरात शोककळा पसरली असून मित्रपरिवार, नातेवाईक आणि परिचितांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. परिचित व्यावसायिक कुटुंबातील तरुणाचा अकाली मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# सरसकट कर्जमाफी साठी आ. रोहीत पवार यांच्या आंदोलनात सहभाग

प्रतिनिधी १४ जून

**अकोट :** शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी साठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे युवा आमदार रोहित पवार यांनी सुरु केलेल्या आंदोलनात अकोट तालुका अध्यक्ष श्रीयश शंकर चौधरी यांचेसह पदाधिकार्यांनी सहभाग घेतला. राज्यशासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी साठी वेगवेगळे नीकसं लावले, अशाने बरेच शेतकरी कर्जमाफी पासुन वंचित राहणार आहे. असन होता सर्व सामायीक शेतकऱ्यांना विनाअट सरसकट कर्जमाफी मीळावी यासाठी रा.का, शरदश्चंद्र पवार पक्षाचे युवा आमदार रोहीत दादा पवार यांनी शुक्रवार दी. १२ जुन पासुन पंढरपूर येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आमरण उपोषण स्थळी हजर राहुन आमदार रोहित दादा पवार यांची भेट घेतली व अकोट तालुक्याचे वतीने त्यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK